https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777


बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ६ वे | अंक –२७२ | गुरूवार दि.११ जुन २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-272 | Thursday, Dt.11 June 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# बीडच्या पुरुषोत्तमपुरी यात्रेत मोठी दुर्घटना:गोदावरी नदीत ५० भाविकांनी भरलेली बोट उलटली; २ महिलांचा मृत्यू







बीड / प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील पुरुषोत्तमपुरी येथे सुरू असलेल्या अधिकमास यात्रेदरम्यान मोठी दुर्घटना घडली. गोदावरी नदीत भाविकांनी भरलेली बोट अचानक पलटल्याने एकच गोंधळ उडाला. अनेक भाविकांना सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असले तरी, दोन महिला भाविकांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे.

देशातील एकमेव भगवान पुरुषोत्तम मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या पुरुषोत्तमपुरी येथे अधिकमास यात्रेनिमित्त मोठ्या संख्येने भाविक दाखल झाले आहेत. याच दरम्यान गोदावरी नदी पार करताना भाविकांनी भरलेली बोट अचानक पलटल्याची घटना घडली. घटनेनंतर नदीकाठावर एकच खळबळ उडाली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे ५० भाविक बोटीत बसून नदी पार करत होते. मात्र बोटीच्या क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवण्यात आल्याचा आरोप भाविकांकडून करण्यात येत आहे. नदीच्या मध्यभागी पोहोचताच बोटीचा तोल गेला आणि काही क्षणांतच बोट उलटली. त्यामुळे सर्व प्रवासी पाण्यात पडले. स्थानिक नागरिक आणि प्रशासनाच्या मदतीने अनेकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले.

या दुर्घटनेत १० ते १२ वर्षांचा एक मुलगा बेपत्ता झाला असून त्याचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांकडून युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू आहे. या घटनेनंतर यात्रेतील सुरक्षाव्यवस्था, बोटींची क्षमता आणि प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. यात्रेच्या काळात अशा घटना टाळण्यासाठी अधिक कडक उपाययोजना करण्याची मागणी भाविकांकडून केली जात आहे.

## महिला भाविकाने सांगितली आपबिती

दरम्यान, बोटीतील प्रवाशांनी अंगावर काटा आणणारा प्रसंग सांगितला. बोट चालवणाऱ्याने ५० पेक्षा अधिक लोकांना बोटीत बसवले. बोटीतील संख्या पाहता अनेक महिला बोटीतून उतरत होत्या. परंतु चालकाने उतरुन दिले नाही. धमकी देऊन बळजबरीने प्रवाशांना बोटीत बसवले, असा आरोप एका महिला भाविकाने केलाय. बोट उलटल्यानंतर सगळे पाण्याच्या तळाला गेले. बोट उलटल्यानंतर मी स्वामी समर्थ, स्वामी समर्थ बोलत राहिले. साडी अडकल्यामुळे मी पाण्याच्या वर आले. बोट चालकावर कारवाई झाली पाहिजे. एका बोटील १० पेक्षा जास्त प्रवाशी बसून दिले नाही पाहिजे, अशी मागणी प्रवासी महिलेने केली.

## दलदल, चिखलातून काढावा लागतोय मार्ग

### पुरुषोत्तमपुरीत प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा भाविकांना फटका





माजलगाव /प्रतिनिधी

संपूर्ण भारतात भगवान पुरुषोत्तमाचे एकमेव मंदिर बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यातील श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे गोदावरी काठावर वसलेले आहे. या अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांवर सध्या प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे चिखलातून आणि दलदलीतून वाट काढण्याची नामुष्की ओढवली आहे.

राज्यातील ९ प्राचीन मंदिरांचे जतन व संवर्धन करण्याची घोषणा चार वर्षांपूर्वी तत्कालीन ठाकरे सरकारकडून करण्यात आली होती, ज्यामध्ये या ऐतिहासिक मंदिराचा समावेश होता. मंदिराच्या जीर्णोद्धार आणि संवर्धनाच्या कामासाठी अर्थसंकल्पात ५४ कोटी ५६ लाख ६० कोटी मंजूर, तरीही कासव गतीने काम !

सुर्डी नजीक ते पुरुषोत्तमपुरी या रस्त्याच्या कामासाठी ६० कोटी ४० लाख रुपयांचा प्रचंड निधी मंजूर झाला आहे. हा रस्ता सुर्डी, राजेगाव, हिवरा, वाघोरा, माळेवाडी, महातपुरी, काळेगावथडी, डुब्बी थडी आणि पुरुषोत्तमपुरी अशा अनेक गावांना जोडणारा मुख्य दळणवळण मार्ग आहे. स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा तीव्र आंदोलने केल्यानंतर अखेर या रस्त्याच्या कामाला मुहूर्त मिळाला खरा, मात्र सध्या हे काम अत्यंत संथ व कासव गतीने सुरू आहे. त्यामुळे पहिल्याच पावसाळ्यात संपूर्ण रस्ता चिखलमय झाला असून कंत्राटदार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कारभारावर नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

सद्यस्थितीत मंदिराचे काम प्रगतीपथावर आहे. मात्र, अत्यंत संतापजनक बाब म्हणजे या मुख्य तीर्थक्षेत्राला जोडणाऱ्या सर्वच जोडरस्त्यांची कमालीची दुरवस्था झाली आहे. रस्त्यांवरील मोठमोठे खड्डे आणि साचलेल्या चिखलामुळे भाविकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

भाविक आणि वाहनधारकांची तारेवरची कसरत..

रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहन चालवताना वाहनधारकांना मोठी कसरत करावी लागत असून वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. ऐन यात्रेच्या तोंडावर रस्त्यांची ही दुरवस्था झाल्याने बाहेरून येणाऱ्या लाखो भाविकांना मनस्ताप सहन करावा लागणार आहे.

## नागरिकांना त्रासदायक ठरत असलेली कचराकुंडी

### वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षकांच्या पुढाकाराने हटवल्याने वाहतुकीला मिळाला मोकळा श्वास..!




बीड । प्रतिनिधी


शहरातील बार्शी रोड हा सध्या वाहतूक कोंडीचा हॉटस्पॉट बनला आहे. या मार्गावर सुरू असलेले रस्त्याचे काम, तसेच परिसरातील अनेक मंगल कार्यालयांमुळे वाहनांची मोठी वर्दळ होत असून वारंवार वाहतूक कोंडीची समस्या ये-जा करणार्यांना त्रासदायक ठरत आहे.

याच दरम्यान, एका प्रसिद्ध हॉटेलसमोर रस्त्यालगत ठेवण्यात आलेली कचराकुंडीही वाहतुकीस अडथळा ठरत होती. कचराकुंडी रस्त्याला चिकटून असल्याने वाहनचालकांना मार्ग काढताना अडचणींचा सामना करावा लागत होता. परिणामी वाहतुकीचा वेग मंदावत होता आणि कोंडीत भर पडत होती.

या समस्येची दखल घेत जिल्हा वाहतूक शाखेचे कर्तव्यदक्ष प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील आणि त्यांच्या सोबत असलेले अंमलदार यांनी तत्काळ कारवाई करत संबंधित कचराकुंडी हटवून सुरक्षित अंतरावर स्थलांतरित केली. या उपाययोजनेमुळे रस्त्यावरील अडथळा दूर झाला असून वाहतूक पूर्वीपेक्षा अधिक सुरळीत झाली आहे.

वाहतूक शाखेने नागरिकांच्या दैनंदिन अडचणी ओळखून केलेल्या या तातडीच्या कारवाईचे शहरवासीयांकडून स्वागत होत असून, वाहतूक व्यवस्थापनासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल प्रभारी पोलीस निरीक्षक व अंमलदार यांचे कौतुक केले जात आहे.



संपादकीय

# राज्याच्या राजकारणात नवी उलथापालथ ?

नवीन १६ विधान परिषद आमदारांमुळे महायुतीला विधान परिषदेत मजबूत बहुमत मिळेल. पावसाळी अधिवेशनापूर्वी शपथ घेतल्यानंतर विधेयके पास करणे सोपे होईल. मविआसाठी पुनरुज्जीवनाची ही आयती संधी आहे. स्थानिक राजकारणाचे भविष्य यामुळे ठरणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय पटावर पुन्हा एकदा विधान परिषद निवडणुकीचे ढग दाटले आहेत. ही निवडणूक केवळ १६ जागा भरण्याची नाही, तर महाराष्ट्राच्या स्थानिक राजकारणाचे संतुलन, विकासाचा प्राधान्यक्रम आणि सत्ताधारी महायुती विरुद्ध विरोधक महाविकास आघाडी यांच्यातील शक्तिपरीक्षण ठरणारी आहे. दीर्घकाळ रिक्त जागांमुळे शेतकरी, सहकार, शहरी विकास आणि ग्रामीण समस्या विधान परिषदेत प्रभावीपणे मांडल्या गेल्या नाहीत. आता नवीन आमदारांकडून मोठ्या अपेक्षा आहेत.

विधान परिषद ही राज्याची वरिष्ठ सभा असून, येथील सदस्य अप्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडले जातात. राज्यातील ७८ सदस्यांपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडले जातात. यापैकी १६ जागा साडेचार वर्षांहून अधिक काळ रिक्त होत्या. आता निवडणूक आयोगाने १८ मे २०२६ रोजी या १६ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे.

इतका उशीर का झाला?

कोरोना महामारी, ओबीसी आरक्षण विवाद, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडणे आणि न्यायालयीन प्रक्रिया यामुळे या जागा २०२२ पासून रिक्त राहिल्या. अनेक आमदारांचा कार्यकाळ २०२२ मध्ये संपला, तर काही २०२४ मध्ये. यामुळे जिल्हा परिषद, महापालिका, नगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या विकासकामांना प्रतिनिधित्व मिळाले नाही. २०२५-२६ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पूर्ण झाल्याने आता ७५ टक्के मतदार संख्या पूर्ण होऊन निवडणूक शक्य झाली आहे.

मतदारसंघ आणि मतदार संख्या

या निवडणुकीत सोलापूर (५९५), अहमदनगर (४६१), ठाणे-पालघर (१०५४), जळगाव (५२६), सांगली-सातारा (८५३), नांदेड (४३२), यवतमाळ (४०५), पुणे (७९८), भंडारा-गोंदिया (४५७), रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग (९४७), नाशिक (५८१), वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली (९७७), अमरावती (४५३), धाराशिव-लातूर-बीड (१०५१), परभणी-हिंगोली (४६८), छत्रपती संभाजी नगर-जालना (५८०) आणि नागपूर (७६१) या मतदारसंघांचा समावेश आहे. मतदार हे महापालिका नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सभापती इत्यादी आहेत.

भूतकाळातील चित्र

या मतदारसंघांत पूर्वी राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात कडवी लढत झाली. सोलापूरमध्ये प्रशांत प्रभाकर परिचारक (भाजप समर्थित) यांनी शेतकरी मुद्द्यांवर सक्रिय भूमिका घेतली. पुण्यात अनिल शिवाजीराव भोसले (राष्ट्रवादी) यांचा काळ सहकार आणि शहरी विकासाशी जोडला गेला, मात्र घोटाळ्यांच्या चर्चेने प्रभावित झाला. अहमदनगरमध्ये अरुणकाका जगताप, जळगावमध्ये चंदूभाई पटेल, अमरावतीमध्ये प्रवीण पोटे यांनी दीर्घकाळ प्रतिनिधित्व केले. मागील निवडणुकांत ९० टक्क्यांहून अधिक मतदान आणि काही ठिकाणी क्रॉस व्होटिंगमुळे अनपेक्षित निकाल लागले होते.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर महायुती (भाजप, शिंदे सेना, अजित पवार गट) सत्तेत आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप आणि सहयोगी पक्षांनी चांगली कामगिरी केली. यामुळे या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व राहण्याची शक्यता प्रबळ आहे. महाविकास आघाडी (काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी श.प.) क्रॉस व्होटिंग टाळण्याचा आणि काही जागांवर आश्चर्य घडवण्याचा प्रयत्न करेल. अर्ज भरणे अद्याप सुरू नसल्याने अंतिम नावे स्पष्ट नाहीत, पण चर्चा जोरात आहे. महायुतीकडून स्थानिक जिल्हा परिषद संभाव्य उमेदवार आणि रणनीती अध्यक्ष, महापालिका नेते, सहकार क्षेत्रातील प्रभावशाली व्यक्तींना संधी मिळण्याची शक्यता. ठाणे, पुणे, नाशिक, विदर्भात भाजपची मजबूत पकड. एकनाथ शिंदे गट आणि अजित पवार गट यांच्यात समन्वय साधला जाईल. मविआकडून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि राष्ट्रवादी (श.प.) सक्रिय असतील. काँग्रेस काही जागांवर सपोर्ट देऊ शकते. पुणे, नाशिक, सोलापूर, रायगड-सिंधुदुर्गसारख्या ठिकाणी तीव्र चुरस अपेक्षित आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात महायुतीची पारंपरिक ताकद असल्याने या जागा त्यांच्या हातच्या असतील. सध्या त्यांची लढत विरोधकांशी नसून आपापसातच आहे. भाजप सगळ्याच पक्षांपेक्षा वरचढ होण्याच्या तयारीत आहे, तर शिंदे आपला आब राखण्याच्या धडपडीत. सुनेत्रा वहिनी अद्याप चाचपडतायत. त्यांना सूर मिळण्यासाठी पटेल, तटकरे आणि पार्थ, जय यांच्यातली पक्ष ताब्यात घेण्याची स्पर्धा कमी व्हायला हवी.

# आखाती समस्या आणि आपण...!

आखातामधील युद्ध सुरु झाल्यानंतर आपणासमोर इंधन संकट उभं राहिलं. देशांत आपण ऊर्जेचा वापर करतो त्यात सर्वाधिक वापर हा पेट्रोलियम उत्पादनांचा आहे आणि याबाबतीत आपण स्वयंपूर्ण नाहीत. आपल्या देशाची आधिकाधिक विदेशी मुद्रा इंधन खरेदीसाठी वापरली जात आहे. या पार्श्वभूमीवर इंधन वाचवण्याचा सल्ला देत आपण काही प्रमाणात या खर्चात बचत केली असली तरी या सर्वांचा एकत्रित परिणाम आपणास महागाईच्या रुपाने सहन करावा लागत आहे.


केवळ पेट्रोल, डिझेल आणि एलपीजी याचाच विचार न करता आगामी काळात एकूणच ऊर्जावापर धोरण देशपातळीवरच नव्हे तर आपणास आपला घराच्या पातळीपर्यंत करण्याची वेळ आज आली आहे.घरात गॅसच्या वापरासोबत आपण विजेचा वापर करतो या विजेच्या निर्मितीमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर आपण आजही जिवाश्म (कोळसा इंधनावर) अवलंबून आहे. येणाऱ्या काळात सूपर एल निनोचे संकट आपल्या समोर आहे. हे संकट जीवनाच्या सर्वच बाजूंनी आपली परिक्षा घेणारे ठरणार आहे.

सूपर एल निनोमुळे पृथ्वीच्या तापमानात २ अंश सेल्सीअसची वाढ होईल असा अंदाज आहे. यामुळे आपला मौसमी पावसाच्या देशात पावसाचे प्रमाण कमी राहणार हे स्पष्ट झाले आहे. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादनावर होणार आहे.

तापमान आणि सिमेटची जंगलं

सध्या हवामान मोजताना आपण वेधशाळेचे आकडे बघतो ते ४३-४४ अंश आणि त्याच्या आसपास आहेत. प्रत्यक्षात संरक्षित जागेत मोजलेले हे तापमान हवामान काय सांगत आहे याचा एक पुरावा असतो.

मोठ्या प्रमाणावर झालेल्या शहरीकरणामुळे ऊंच सिमेंटच्या इमारतीचं जंगल आणि त्यात सिमेंट किंवा डांबरी रस्ते अशा वातावरणात दृश्य तापमान ४५ अंश असले तरी पृष्ठभागीय




तापमान ५० अंशांपर्यंत वाढलेले असल्याने शहरी भागात उन्हाळा अधिक जाणवतो आणि हे सर्व पृष्ठभाग थंड लवकर होत नाहीत. त्यामुळे रात्रीच्या तापमानात देखील आपणास उष्णता जाणवत राहते उष्णतेपासून बचाव अर्थात पंखे, कुलर आणि ए.सी. यांचा वाढलेला वापर ज्याचा ताण मग वीज निर्मितीवर होतो आणि मग अनेक भागात लोडशेडींग आणि उष्णता असा दुहेरी त्रास जाणवत असतो आपल्याकडे उन्हाळ्यात विजेची मागणी आणि पुरवठा यामध्ये गेल्या २ वर्षात तफावत वाढताना दिसत आहे. वीज निर्मिती केंद्रांवरील ताण वाढत आहे. याला पर्याची ऊर्जा माधन मृणजे सौर ऊर्जा, पवन ऊर्जा आणि जलविद्युत त्यात देश वेगाने वाटचाल करीत आहे. तथापि मागणी सातत्याने वाढत राहिल्यामुळे ही स्थिती कायमच आहे. एल-निनोच्या काळात हे संकट अधिक गहिरे होणार आहे.

आखाती युद्ध एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला सूपर एल-निनो चे घोंघावणारे संकट या पार्श्वभूमीवर शासन उपाय योजना करीतच आहे परंतु आपण देखील आपली जबाबदारी ओळखून यात योगदान देणे आवश्यक आहे सार्वजनिक वाहन प्रणालीचा वापर वाढवण्याची गरज निर्माण झाली आहे. कोरोना संकटानंतर प्रत्येकाने सुरक्षा म्हणून स्वतःचे वाहन वापरणे सुरु केले यामुळे इंधन संकटासोबत पर्यावरण प्रदूषण, कार्बन उत्सर्जन, ध्वनी प्रदूषण आणि रस्ते अपघात असे नवे दुष्टचक्र आता समोर येत आहे

सौर ऊर्जेच्या वापरातून आपण स्वतःच्या गरजेपुरती ऊर्जा किंवा त्यातील निम्मा वाटा प्रधानमंत्री सूर्यघर सारख्या योजनांमधून उचलू शकतो. पेट्रोलियम खर्चात कपात करण्यासाठी आता इलेक्ट्रीक आणि सीएनजी वर चालणारी वाहने बाजारात आली आहेत आणि त्याला चांगला प्रतिसाद दिसत आहे. असे असले तरी आगामी काळात याला अधिक गती देण्याची गरज आहे

देशातील अग्रगण्य कंपनीने नुकतीच ए-८५ वाहन मालिका सादर केली आहे. आपण सध्या ए-२० इंधन अर्थात २० टक्के इथेनॉल मिश्रीत पेट्रोत वापरत आहोत. ए-८५ आगामी काळात वापरायची तयारी करावी लागणार आहे. या ए-८५ मुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे आणि आगामी काळ ए-३०, ए-५० व ए-८५ वाहनांचा होईल हे नकी यातून पर्यावरण रक्षणाला देखील हातभार लागणार आहे.

आपला या आसेतू हिमाचल देशात विविध प्रांतात विविध भौगोलिक रचना आणि आव्हाने आहेत. त्यात अडकून न पडता आपण या क्षमतेच्या निराकरणात अल्पसा वाटा उचलला तरी येणाऱ्या संकटाचे गांभीर्य कमी करता येईल. याबाबत प्रत्येकाने जरूर विचार करावा.

**प्रशांत दैठणकर**
९८२३१९९४६६

# दिवसा ‘बंद’चा दिखावा, रात्री वाळूचा धुमाकूळ ?

## गंगामसला घाटावर नेमकं चाललंय तरी काय ?

माजलगाव । प्रतिनिधी

गंगामसला परिसरातील वाळू उपशाबाबतचे कथित गैरप्रकार उघड करणारी बातमी प्रसिद्ध होताच संबंधित वाळू घाट दिवसभर बंद ठेवण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र, हा बंद खरोखर प्रशासनाच्या कारवाईची भीती होती की जनतेची दिशाभूल करण्याचा डाव, असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

स्थानिक शेतकरी आणि नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, दिवसभर घाटावर शांतता असल्याचे चित्र निर्माण केले जाते; परंतु रात्रीच्या अंधारात पुन्हा वाळू उपशाचे काम वेगाने सुरू होत असल्याचा आरोप केला जात आहे. त्यामुळे दिवसा बंद, रात्री धंदा हे नवे सूत्र अवलंबून प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे.

विशेष म्हणजे, घरकुल लाभार्थ्यांच्या नावाखाली वाळू उपसा सुरू असल्याचा दावा केला जात असताना, लाभार्थ्यांनाच वेठीस धरण्याचे प्रकार घडत असल्याचे आरोप होत आहेत. दिवसभर घाट बंद ठेवून घरकुल लाभार्थ्यांना वाळूपासून वंचित ठेवायचे आणि रात्री कथित काळाबाजारातून वाळूची वाहतूक करायची, असा प्रकार सुरू असल्याचा आरोप



स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

प्रशासनाकडून वारंवार वाळू बंद आहे, फक्त घरकुलासाठी वाळू सुरू आहे असे सांगितले जात असल्याची चर्चा आहे. मात्र, जर खरोखरच फक्त घरकुलासाठीच वाळू उपसा होत असेल, तर रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या कथित हालचाली कोणत्या कामासाठी आहेत, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

स्थानिकांच्या मते, नदीपात्रात यंत्रांच्या सहाय्याने होणारा कथित वाळू उपसा, रात्रीची वाहतूक आणि दिवसभर बंदचा दिखावा याकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

दिवसा बंद आणि रात्री सुरू हा प्रकार खरा असेल तर तो केवळ महसूल तोट्याचा विषय नाही, तर शासनाच्या नियमांची उघडपणे पायमल्ली असल्याचे मानले जाईल. त्यामुळे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त आणि वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांनी या संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी जोर धरत आहे.

गंगामसला घाटावर नेमके काय सुरू आहे ? घरकुलाच्या नावाखाली कोणाचा फायदा होत आहे ? आणि रात्रीच्या कथित वाळू उपशाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष का? या प्रश्नांची उत्तरे आता जनतेला हवी आहेत.

'माफियांचे' धाडस अधिकाऱ्यांच्या संगनमताने वाढले ?

गंगामसला वाळू घाटावर सुरू असलेल्या अवैध उत्खननाबाबत भाजप तालुकाध्यक्ष डॉ.अभिजीत सोळंके यांनी खळबळजनक आरोप केले आहेत. उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले आणि तहसीलदार संतोष रुईकर यांच्या आशिर्वादानेच वाळू माफियांनी प्रशासनाला वेठीस धरले असून, त्यांचे 'धाडस' वाढले आहे, असे डॉ.सोळंके यांनी म्हटले आहे. या गंभीर आरोपामुळे महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, कारवाईची मागणी जोर धरत आहे.

ओव्हरलोड टिप्पर, ट्रॅक्टरमुळे अपघाताची भीती..

स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, नमूद ५ गावांच्या घाटांवर नदीपात्रात यंत्रसामग्री उतरवून मोठ्या प्रमाणावर वाळू काढली जात आहे. त्यानंतर ओव्हरलोड टिप्परद्वारे वाळूची वाहतूक केली जात असून रस्त्यावर सर्वत्र वाळू सांडत आहे. अनेक ठिकाणी रस्त्यावर वाळूचे थर साचल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याच्या घटना वाढल्या आहेत. भरधाव वेगाने जाणाऱ्या टिप्परमुळे शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाला आहे. धुळीच्या लोटांमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून श्वसनाचे तसेच डोळ्यांचे विकार वाढल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत.

प्रशासनाकडून कारवाईची प्रतीक्षा...

एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि उघडपणे सुरू असलेला हा उपसा महसूल, पोलीस व खनिकर्म विभागाच्या निदर्शनास येत नाही का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. अलीकडे जिल्ह्यातील इतर भागात वाळू तस्करीविरोधात कारवाई झाल्यानंतरही या पट्ट्यात प्रतिबंधात्मक उपाययोजना दिसून येत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

# बाभळी येथे संपन्न झालेल्या मोफत

## नेत्र शिबीरास उत्स्फुर्त प्रतिसाद



धर्माबाद / अशोक पडोळे

तालुक्यातील मौजे बाभळी बंधारा येथे तेलंगानातील मुधोळ येथील एल.व्ही.प्रसाद नेत्र रुग्णालयाच्या वतीने दि. ९ जून २०२६ मंगळवारी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर घेण्यात आले. यास नागरीकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असून एकूण १५१ रुग्णांच्या डोळयांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी ३९ रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया तर १८ रुग्णांच्या डोळयावरील मास आल्यामुळे होणारी मोफत शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. शस्त्रक्रियेसाठी रुग्णांना घेऊन जाण्यासाठी नेत्र रुग्णालयाच्या वतीने सोय करण्यात आली आहे. या मोफत नेत्ररोग तपासणी व शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन मराठी पत्रकार संघाचे जिल्हाउपाध्यक्ष जी. पी. मिसाळे यांनी केले होते.

डोळा हा शरीराचा अतिशय महत्वपूर्ण अंग आहे. माणूस जीवनाचा आनंद डोळयामुळेच घेवू शकतो. याची काळजी घेणे अतिशय महत्वाचे आहे. परंतु वयोमानानूसार डोळयाचे अनेक आजार माणसाला होतात त्यात प्रामुख्याने मोतीबिंदू आहे. मोतीबिंदुच्या शस्त्रक्रियेसाठी खाजगी दवाखान्यात गेल्यास हजारो रुपये खर्च करावे लागतात जे की सामान्य नागरीकांना परवडणारे नसते. ही अडचण लक्षात घेवून तेलंगानातील एल. व्ही. प्रसाद आय इंस्टिटयूट अंतर्गत भोसले गोपालराव पाटील नेत्र रुग्णालय मुधोळ यांच्या वतीने ठिकठिकाणी मोफत नेत्र तपासणी, उपचार व शस्त्रक्रिया तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येते. बाभळी बंधारा येथे संपन्न झालेल्या शिबीरात एल.व्ही. प्रसाद नेत्र रुग्णालयाचे तपासणी अधिकारी शेषेराव वाघमारे, कॅम्प सुपरवायझर पेंडेला लक्ष्मण लॅब सुपरवायझर गंगाधर लव्हाळे, व्यवस्थापक देबाशिष मोहापात्र, कनिष्ठ तपासणी अधिकारी कु. संगीता हे सहभागी होते.

सदरील शिबीर यशस्वी करण्यासाठी बाभळी बंधारा येथील सरपंच प्रतिनीधी धनराज पा. कदम, बापूराव पा. कदम, साईप्रसाद पा. कदम, कृ.ऊ.बा.समिती माजी संचालक शिवाजी पाटील, माजी पोलीस पाटील शंकरराव पाटील, पं.स.मा. सभापती जयराम पा.कदम, सर्जेराव पा. कदम, प्रकाश पा. सुर्यवंशी, प्रताप पा. कदम, गौतम मिसाळे, पृथ्वीराज चाबुकस्वार, जि.प.प्रा. शाळेचे मुख्याध्यापक पी. ए. हिवराळे यांनी परिश्रम घेतले.

# मान्सून मुंबईच्या दिशेने, राज्यात यलो अलर्ट

## मान्सूनचा वेग जास्त, पण देशात अद्यापही सरासरीपेक्षा २२% कमी पाऊस

मुंबई - केरळमध्ये दाखल झाल्यानंतर अवघ्या ६ दिवसांत नैऋत्य मोसमी पाऊस ईशान्येतील सर्व राज्ये, सिक्कीम आणि उप-हिमालयीन पश्चिम बंगालपर्यंत पोहोचला असून मुंबईच्या दिशेने आगेकूच करत आहे. मात्र, मान्सूनचा वेग जास्त असूनही देशात झालेला पाऊस सरासरीपेक्षा २२% कमी आहे. १ ते ८ जूनपर्यंत २१.३ मिमी पाऊस झाला, तर सरासरी आकडा २७.२ मिमी आहे.हवामान विभागाच्या माहितीनुसार, मान्सून १६ राज्यांपर्यंत पोहोचला आहे. पुढील २४ तासांत तो मुंबईत, त्यानंतर ३ ते ५ दिवसांत महाराष्ट्राचा उर्वरित भागासह आंध्र प्रदेश, ओडिशा, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडपर्यंत पोहोचू शकतो. हवामान तज्ज्ञांच्या मते, जूनच्या पहिल्या आठवड्यात मान्सून संथ होता. अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागरात अनुकूल परिस्थितीमुळे वेग वाढला. दरम्यान, हवामान विभागाने महाराष्ट्रात कोकणासह संपूर्ण राज्यभरात २ ते ४ दिवस पावसाचा यलो अलर्ट जारी केला आहे. यादरम्यान मराठवाडा, मध्य महाराष्ट्रात १२ जूनपर्यंत तर विदर्भात १३ जूनपर्यंत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे.

एल निनो प्रभावातील १९७ जिल्ह्यांसाठी योजना तयार



कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी मंगळवारी सांगितले की, सरकारने देशभरातील असे १९७ जिल्हे निश्चित केले आहेत, जे एल निनोच्या प्रभावाच्या दृष्टीने सर्वाधिक संवेदनशील आहेत. कृषी मंत्रालयाने सर्व राज्यांसाठी वेगवेगळ्या आकस्मिक योजना तयार केल्या आहेत.

राज्यात ३९ दिवसांत झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीट आणि वेगवान वादळी वाऱ्यांमुळे शेती क्षेत्राचे कंबरडे मोडले आहे. निसर्गाच्या या लहरीपणाचा मोठा फटका बसला असून, तब्बल ५६ हजार ५३३ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे अतोनात नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल राज्य प्रशासनाने जाहीर केला आहे. या अस्मानी संकटामुळे राज्यातील २४ जिल्ह्यांतील शेतकरी पुरता अडचणीत सापडला असून नगदी फळबागा, भाजीपाला आणि हंगामी पिके मातीमोल झाली आहेत.

नुकसानग्रस्त भागात सध्या महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकांकडून पंचनामे युद्धपातळीवर सुरू असून, अंतिम अहवाल आल्यानंतर मदतीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला जाणार आहे. मात्र, ऐन खरिपाच्या तोंडावर हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून तातडीने आर्थिक मदतीची मागणी केली जात आहे. प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार राज्यात १ मे ते ८ जून या ३९ दिवसाच्या कालावधीत मोठे नुकसान सोसावे लागले



# आरक्षणावर कुठलाही घाला आम्ही सहन करणार नाहीत..!
## उपवर्गीकरणाविरोधात बीड ते मुंबई आंबेडकरी समाजाचा पायी लाँग मार्च

बीड/प्रतिनिधी

अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावाविरोधात राज्यभरातील आंबेडकरी पक्ष, संघटना आणि सामाजिक चळवळींनी निर्णायक लढ्याचा बिगुल फुंकला असून, आरक्षण वाचवा, उपवर्गीकरण हटवा या घोषणांसह बीड ते मुंबई पायी लाँग मार्चला बुधवार (दि.१०) जून रोजी उत्स्फूर्त सुरुवात झाली. हा लाँग मार्च २६ जून रोजी मुंबईत दाखल होणार आहे. निळ्या झेंड्यांचा महासागर, संविधानाच्या संरक्षणाच्या घोषणा आणि शेकडो कार्यकर्त्यांच्या निर्धारामुळे बीड शहरात आंदोलनाचे वातावरण निर्माण झाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून निघालेल्या या मार्चमध्ये विविध आंबेडकरी संघटनांचे पदाधिकारी, युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. हा संघर्ष कोणत्याही समाज किंवा जातीविरोधात नसून संविधानाने दिलेल्या आरक्षणाच्या हक्काच्या संरक्षणासाठी असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.

मार्चदरम्यान सरकारवर गंभीर आरोप करत आंदोलकांनी सांगितले की, उपवर्गीकरणासाठी स्थापन करण्यात आलेल्या बदर समितीचा अहवाल अद्याप जनतेसमोर न आणता निर्णय प्रक्रिया पुढे नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा अहवाल तातडीने सार्वजनिक करावा आणि सर्व संबंधित घटकांना त्यावर अभ्यासपूर्वक मते व हरकती नोंदविण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा, अशी मागणी करण्यात आली. त्यासाठी मुदत ३० ऑगस्टपर्यंत वाढविण्याचाही आग्रह धरण्यात आला.

आंदोलनकर्त्यांनी असा दावाही केला की, समाजातील सर्व घटकांचा व्यापक संवाद न साधता कोणताही निर्णय घेणे सामाजिक तणाव वाढवू शकते. त्यामुळे अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्व ५९ घटकांचे प्रतिनिधी, लेखक, साहित्यिक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते आणि समाजनेते यांची संयुक्त समिती स्थापन करून सर्वसमावेशक चर्चा व्हावी, अशी मागणी करण्यात आली.

या लाँग मार्चमध्ये केवळ उपवर्गीकरणाचाच मुद्दा नसून कंत्राटी नोकरभरती, शिक्षणाचे वाढते खासगीकरण, अनुसूचित जाती-जमातींचा अनुशेष, जातनिहाय जनगणना आणि समान व मोफत शिक्षण अशा अनेक प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संविधानिक हक्कांवर कोणताही परिणाम होईल, असे वाटल्यास राज्यभर व्यापक लोकआंदोलन उभारण्याचा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला.

# भूमिहीन शेतकरी पत्नीच्या खांद्यावरून उतरले जोखड...!
## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची संवेदनशीलता, प्रशासनाची तत्परता

मुंबई : वीज पडून बैल दगावल्याने जोखडाला पत्नीला जुंपण्याची वेळ आलेल्या लातूर जिल्ह्यातील भूमिहीन शेतकरी काशिनाथ गायकवाड यांच्या व्यथेची दखल थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, अन् या शेतकरी कुटुंबाला अवघ्या काही तासात बैल आणि दगावलेल्या बैलाच्या नुकसान भरपाई पोटीची रक्कम मिळाली. यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे निर्देश आणि जिल्हा प्रशासनासोबतच, अन्य विभागांनी दाखवलेली संवेदनशीलता चर्चेची ठरली आहे. या संवेदनशीलतेमुळे आता काशिनाथ गायकवाड यांना पत्नीला बैलाच्या जागी जूंपावे लागणार नसल्याने, या कष्टकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला.

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्दचे काशिनाथ गायकवाड भूमिहीन शेतकरी. त्यांच्याकडे असलेल्या बैलजोडीच्या मदतीने श्री. गायकवाड व त्यांच्या पत्नी सौ. हौसाबाई परिसरातील शेतकऱ्यांची जमीन कसतात. मशागतीची, नांगरणी ते पेरणी, वखरणी अशी मिळेल ती कामे करतात, यावरच त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे. यातच त्यांच्यावर दुर्दैव ओढवले. त्यांच्याकडील एका बैलाचा शुक्रवारी (५ जून) झालेल्या वादळी पावसात वीज पडून मृत्यू झाला. त्यामुळे मिळालेली कामे पूर्ण



करण्यासाठी, श्री. गायकवाड यांना पत्नी सौ. हौसाबाई यांना जुंपावे लागल्याचे वृत्त मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यापर्यंत पोहचले. यावर त्यांनी मुख्यमंत्री सचिवालयाला तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानुसार प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्या संपर्कात राहून, लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांना महसूलसह, सर्व यंत्रणांना श्री. गायकवाड यांना तत्काळ मदत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार तहसिल कार्यालयासह, पशूसंवर्धन, कृषी सर्व यंत्रणा श्री. गायकवाड यांच्यापर्यंत पोहचल्या.

पशूसंवर्धन विभागाने प्रयत्नपूर्वक एक बैल उपलब्ध करून घेतला आणि तो जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड, तहसिलदार सोमनाथ वाडकर यांच्यासह पशूसंवर्धन विभागाचे अधिकारी आदींच्या उपस्थितीत थेट गायकवाड कुटुंबियांकडे सुपूर्द करण्यात आला. यामुळे काशिनाथ गायकवाड यांच्यासर, त्यांच्या कुटुंबियांच्या चेहऱ्यावर समाधान पसरले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी तातडीने दखल घेत, बैल मिळवून दिल्याने गायकवाड यांच्या पत्नी सौ. हौसाबाई आणि मुलगा पुंडलिक यांनी समाधान व्यक्त केले. त्यांनी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्यासह, जिल्हा प्रशासनाचेही आभार मानले. सौ. हौसाबाई म्हणाल्या, आमच्या एका बैलाचा वीज पडून मृत्यू झाल्याने दुर्दैवाने आमच्यावर अशी वेळ आली. पण आमच्या अडचणीची दखल घेऊन, लगेचच मदत मिळाल्याने बरे वाटले. आता पुढे येणाऱ्या खरीप हंगामासाठी मिळालेली कामे पूर्ण करण्याची चिंता दूर झाली. बैल पण चांगला मिळाला आहे. आता त्याची पण चागंली काळजी घेऊ आणि मिळालेली कामे देखील चांगली होतील असे बघू. नैसर्गिक आपत्तीमध्ये जनावरांचा मृत्यू झाल्यास राज्य आपत्ती प्रतिसाद निधीतून तातडीने अर्थसहाय्य उपलब्ध करून दिले जाते. श्री. गायकवाड यांच्या दगावलेल्या बैलाचा तातडीने पंचनामा आणि शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून नियमानूसार आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले आहे. ही रक्कम श्री. गायकवाड यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

# आदिवासी समाजाने शिक्षण, कौशल्य आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग स्वीकारावा- राज्यपाल जिष्णु देव वर्मा

मुंबई : आदिवासी समाजाने शिक्षण, कौशल्य विकास, नवोपक्रम आणि आत्मनिर्भरतेच्या माध्यमातून प्रगती साधत राष्ट्रनिर्माणात प्रभावी भूमिका बजावावी, असे आवाहन महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.महाराष्ट्र लोकभवन येथे आयोजित भगवान बिरसा मुंडा यांच्या १२६ व्या बलिदान दिन कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्यासह विविध लोकप्रतिनिधी तसेच वेगवेगळ्या भागातून आलेले आदिवासी बांधव, आदिवासी कलाकार,आदी उपस्थित होते.

राज्यपाल वर्मा म्हणाले की, अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात



बिरसा मुंडा यांनी सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जागृती घडवून आणली. अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, सामाजिक कुरीती आणि विभाजनाविरुद्ध त्यांनी उभारलेला लढा आजही प्रेरणादायी आहे.

आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र आणि राज्य शासन सातत्याने प्रयत्नशील असल्याचे सांगून राज्यपाल म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जनजातीय विकासाविषयीच्या भूमिकेमुळे आदिवासी समाज शिक्षण, रोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या क्षेत्रात पुढे जात आहे.

शिक्षण हीच व्यक्तीला आत्मनिर्भर आणि सक्षम बनविणारी सर्वात मोठी शक्ती आहे. राज्य शासनाकडून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृहे, भोजन व अन्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जात असून पालकांनी आपल्या मुलांना, विशेषतः मुलींना महाविद्यालयीन शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन राज्यपाल वर्मा यांनी केले.

भारतीय इतिहासातील गोंडवाना राज्य आणि गोंड शासकांच्या गौरवशाली परंपरेचे कौतुक करत राज्यपाल वर्मा म्हणाले की, आदिवासी समाजाने हा गौरव पुन्हा प्राप्त करण्यासाठी शिक्षण, कौशल्य विकास आणि आर्थिक समृद्धीचा मार्ग स्वीकारणे आवश्यक आहे. समाजाला कुपोषण, आजारपण आणि व्यसनमुक्त करण्यासाठीही व्यापक प्रयत्नांची गरज आहे.

आदिवासी कला, नृत्य आणि संगीताच्या जतनासाठी व्यापक कृती आराखडा तयार करण्याच्या सूचना आदिवासी विकास विभागाला देण्यात आल्या आहेत. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था (ढढख) यांनी देखील देशातील विविध आदिवासी समाजांचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि ज्ञानव्यवस्थेचे दस्तावेजीकरण करावे, असे निर्देश दिले असल्याचेही राज्यपालांनी सांगितले.ज्येष्ठ तारपा वादक व लोककलावंत भिकल्या धिंडा यांना पद्मश्री पुरस्कार मिळाल्याचा उल्लेख करत राज्यपालांनी त्यांचे अभिनंदन केले.

# जिल्हास्तरीय आधार नोंदणी समितीची बैठक संपन्न



बीड : जिल्ह्यात आगामी १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत आहे. या पार्श्वभूमीवर शाळा सुरू होताच विद्यार्थ्यांच्या आधार नोंदणी आणि अद्ययावतीकरणासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवून विशेष शिबिरांचे आयोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हास्तरीय आधार नोंदणी समितीची बैठक पार पडली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, विस्तार अधिकारी आर.सी. खोड, जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक महेश गोले, महाआयटीचे जिल्हा समन्वयक मनोजकुमार गुंड यांची प्रमुख तर आधार प्राधिकरणाचे उपसंचालक मंदार जेवरे, कुलदीपसिंग गेहलोत यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी श्री. जॉन्सन म्हणाले की, शाळा सुरू होण्यापूर्वीच प्रत्येक तालुकानिहाय आणि शाळानिहाय आधार शिबिरांचा एक ठोस मास्टर प्लॅन तयार करावा. ज्या शाळा १५ जूनपासून नियमित सुरू होत आहेत, त्याच ठिकाणी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात यावे, जेणेकरून विद्यार्थ्यांना किंवा पालकांना इतरत्र जाण्याची गरज पडणार नाही. तसेच यामध्ये वय ५ आणि १५ वर्ष पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे बायोमॅट्रिक अद्ययावतीकरण करण्यावर विशेष भर दिला जावा. संपूर्ण प्रक्रिया राबविताना शासनाने घालून दिलेल्या सर्व नियमांचे व निर्देशांचे काटेकोरपणे पालन केले जावे.अनेक शासकीय योजना, शिष्यवृत्ती आणि शैक्षणिक प्रक्रियांसाठी विद्यार्थ्यांचे आधार कार्ड लिंक असणे आणि ते अद्ययावत असणे अत्यंत आवश्यक आहे. शाळा सुरू होताच पहिल्या दिवसापासूनच या मोहिमेला गती दिल्यास कोणताही विद्यार्थी शासकीय लाभांपासून वंचित राहणार नाही, असा विश्वासही जिल्हाधिकारी श्री.जॉन्सन यांनी यावेळी व्यक्त केला आहे. तसेच सध्या सुरु असलेल्या सीबीएसई तसेच आयसीएसई शाळेत आजपासून नियोजन करुन शिबीराचे आयोजन करावे. भारतीय पोस्ट खात्याने त्यांच्याकडे उपलब्ध असलेले ग्रामीण डाकसेवक यांच्यामार्फत या कामात मदत करावी, अशी सुचनाही त्यांनी केली.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी महिला व बाल विकास, शिक्षण, भारतीय टपाल खाते, जिल्हा आरोग्य विभाग यासह सर्व संबंधित यंत्रणांनी परस्परांशी समन्वय ठेवून हा मास्टर प्लॅन तात्काळ अंमलात आणण्याचे आदेश दिले असून, हलगर्जीपणा करणाऱ्यांवर कारवाईचा इशाराही दिला आहे.

# भोकरदनमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

भोकरदन / ईसरारखान पठाण

महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वसामान्यांच्या न्यायासाठी २७ वर्षे अविरत संघर्ष करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचा २७ वा वर्धापन दिन आज भोकरदनमध्ये मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला.



मा. आमदार चंद्रकांत पुंडलिकराव दानवे यांच्या संपर्क कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे तालुकाध्यक्ष रमेशशेठ सपकाळ यांनी भूषवले. आमदार चंद्रकांत दानवे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले होते.

२७ वर्षांचा गौरवशाली प्रवास

यावेळी बोलताना कार्यकर्त्यांनी सांगितले की, शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या २७ वर्षांच्या प्रवासाचा हा अभिमानाचा क्षण आहे. शरदचंद्र पवार साहेबांच्या पुरोगामी विचारांचा वारसा पुढे नेण्याची शपथ यावेळी घेण्यात आली.

साहेबांच्या नेतृत्वाखाली विकासाची बांधिलकी कार्यक्रमात आमदार चंद्रकांत दानवे यांच्या नेतृत्वाखाली जनतेच्या प्रश्नांसाठी लढण्याची प्रेरणा घेऊन, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याचा संकल्प कार्यकर्त्यांनी केला. शरद पवार साहेबांच्या विचारांना तळागाळापर्यंत पोहोचवणे हाच यापुढील काळातील ध्यास असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले

कार्यक्रमाला उपस्थित नगराध्यक्ष शमीम भाई मिर्झा, गटनेते शफिक शेठ पठाण, उपनगराध्यक्ष राजेंद्र जाधव, नगरसेवक नसीम पठाण, अजहर शहा, चंद्रकांत पगारे, डॉ. शालिकराम सपकाळ, धनराज भारती, अब्दुल कदिर बापू, आमेर पठाण, रामदास पा. रोडे, महेश औटी,गंगाधर कांबळे, अभिमन्यू जाधव, सुनील लाड, अमोल खरात सर, रमेश पाटील बरडे, अंगद पाटील सहाने, केतन साळवे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी व मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.शेवटी पक्षाचा हा प्रवास अधिक यशस्वी होवो आणि जनतेच्या आशा-अपेक्षांचे प्रतिनिधित्व करत राहो, अशी सदिच्छा व्यक्त करण्यात आली.

# १५ जून पासुन दाढी कटिंग साठी मौजावे लागणार जास्तीचे पैसे
## वाढत्या महागाईमुळे सलून व्यवसायात करण्यात आली २० टक्क्याची वाढ



प्रतिनिधी । जाफराबाद

केस कापणारा, दाढी करणारा, लग्नसमारंभापासून ते प्रत्येक शुभकार्यामध्ये समाजाचा अविभाज्य भाग असलेला नाभिक समाज आज स्वतःच्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. ग्राहकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारा सलून व्यवसाय गेल्या काही वर्षांत वाढती महागाई, आर्थिक मंदी आणि वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली अक्षरशः दबला गेला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नाभिक महामंडळाने सलून सेवांच्या दरामध्ये २० टक्के वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. १ जून २०२६ रोजी झालेल्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात आले असून नवीन दरवाढ येत्या १५ जूनपासून संपूर्ण महाराष्ट्रात लागू होणार आहे.

गेल्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय घडामोडींमुळे इंधन दरात झालेली वाढ आता प्रत्येक वस्तू आणि सेवेमध्ये दिसून येत आहे. वाहतूक खर्च वाढल्यामुळे बाजारातील प्रत्येक वस्तू महाग झाली आहे. सलून व्यवसायासाठी लागणारे शॅम्पू, हेअर कलर, ब्लीच, फेशियल क्रीम, जेल, वॅक्स, डिस्पोजेबल वस्तू आणि इतर साहित्य पेट्रो-केमिकल उद्योगाशी संबंधित आहेत. दुकानभाडे, वीजबिल, बँकांचे वाढते व्याजदर आणि स्थानिक कर यामुळे व्यावसायिकांना आर्थिक ताळमेळ बसवताना मोठी कसरत करावी लागत आहे. दरम्यान, हा राज्यातील हजारो सलून व्यावसायिक आणि त्यांच्या कुटुंबांच्या जगण्याचा प्रश्न असल्याचेही नाभिक महामंडळाचे राज्याध्यक्ष सयाजी झुंजार यांनी स्पष्ट केले आहे.

# इंदेवाडीजवळ थरारक घटना चलत्या ओव्हरलोड स्क्रॅप ट्रकमधून भंगार रस्त्यावर कोसळले
## आरटीओ आणि वाहतूक पोलिसांचे अंधत्व की ओव्हरलोड वाहतुकीला अभय ?

जालना शेख फारुक

जालना-अंबड महामार्गावरील इंदेवाडी परिसरात बुधवारी घडलेल्या एका धोकादायक घटनेने आरटीओ आणि वाहतूक पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.अंबडकडून जालना एमआयडीसीकडे भंगार स्क्रॅप घेऊन जाणाऱ्या एका ओव्हरलोड ट्रकमधून अचानक मोठ्या प्रमाणात लोखंडी भंगार रस्त्यावर कोसळल्याने काही काळ परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले.

सुदैवाने त्या क्षणी ट्रकच्या मागे कोणतेही वाहन नसल्यामुळे मोठी दुर्घटना टळली.मात्र जर एखादी दुचाकी,चारचाकी किंवा प्रवासी वाहन त्या ठिकाणी असते तर भीषण अपघात होऊन अनेक निष्पापांचे जीव धोक्यात आले असते. त्यामुळे या घटनेने नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार जालना एमआयडीसीतील स्टील उद्योगांसाठी दररोज शेकडो टन भंगार आणि लोखंडी सळई वाहून नेणारे ट्रक अंबड मार्गे ये-जा करतात. यापैकी अनेक ट्रक क्षमतेपेक्षा जास्त माल भरून खुलेआम रस्त्यावर धावत असतात. वाहनांच्या बाजूंनी बाहेर आलेल्या सळया,सैल बांधलेले भंगार आणि बेदरकार वाहतूक यामुळे नागरिकांच्या जीवाशी अक्षरशः खेळ सुरू आहे.आरटीओला हे ट्रक दिसत नाहीत का ?विशेष म्हणजे हेल्मेट नसलेले दुचाकीस्वार कागदपत्रांतील किरकोळ त्रुटी किंवा लहान वाहनांवर आरटीओ आणि वाहतूक पोलीस तत्परतेने कारवाई करताना दिसतात. मात्र टनावारी अतिरिक्त माल घेऊन धावणाऱ्या ओव्हरलोड ट्रकांवर कारवाई करण्याची वेळ आली की संबंधित यंत्रणा गूढ शांतता का बाळगते असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.हे ट्रक आरटीओच्या नजरेस पडत नाहीत का ? की काही महिन्याकाठी मिळणाऱ्या मलिद्या मुळे या वाहनांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जाते ? असा संतप्त



प्रश्न नागरिक विचारत आहेत. या मार्गावर दिवस-रात्र सुरू असलेली ओव्हरलोड वाहतूक सर्वसामान्यांना स्पष्टपणे दिसत असताना प्रशासन मात्र अनभिज्ञ असल्याचे दाखवत असल्याची टीका होत आहे.अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का ?

इंदेवाडीतील घटना ही केवळ एक दुर्घटना नसून भविष्यातील मोठ्या संकटाची पूर्वसूचना असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आज भंगार रस्त्यावर पडले उद्या एखाद्या वाहनावर किंवा नागरिकांवर कोसळले तर त्याची जबाबदारी कोण घेणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.स्थानिकांनी आरोप केला की ओव्हरलोड वाहतुकीमुळे रस्त्यांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या निधीवर पाणी फेरले जात आहे. तरीदेखील संबंधित विभागाकडून प्रभावी कारवाई होताना दिसत नाही.

नागरिकांच्या प्रमुख मागण्या

जालना-अंबड मार्गावर कायमस्वरूपी विशेष आरटीओ तपासणी नाके उभारावेत.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई करावी.

नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण करणाऱ्या वाहनमालकांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया राबवावी.वाहतूक पोलीस व आरटीओ विभागाच्या भूमिकेची चौकशी करावी.प्रशासनासाठी धोक्याची घंटाइंदेवाडीतील हा प्रकार प्रशासनाच्या निष्क्रियतेचा आणि ओव्हरलोड वाहतुकीच्या वाढत्या धोक्याचा जिवंत पुरावा मानला जात आहे. आता तरी आरटीओ आणि वाहतूक पोलीस विभाग जागे होऊन कठोर कारवाई करणार की पुन्हा एखाद्या मोठ्या दुर्घटनेनंतर केवळ पंचनामे आणि चौकशाच सुरू राहणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या ओव्हरलोड वाहतुकीला अभय देणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे अशी तीव्र मागणी आता जोर धरत आहे.

## बारसवाडा येथे आनंद अनुभूती शिबिर उत्साहात संपन्न

# गुरुदेवांच्या विचारांनी परिसर भारावला



अंबड प्रतिनिधी

आर्ट ऑफ लिव्हिंगच्या वतीने आणि पूज्य गुरुदेव श्री.श्री.रवि शंकर यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त मौजे बारसवाडा येथे आयोजित करण्यात आलेले सहा दिवसीय आनंद अनुभूती शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. दि. ४ जून ते ९ जून या कालावधीत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारसवाडा येथे झालेल्या या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.शिबिरामध्ये ध्यान, योग प्राणायाम, सुदर्शन क्रिया, तणावमुक्त जीवनशैली, सकारात्मक विचारसरणी, निरोगी आरोग्य, आत्मविश्वास वृद्धी, रागावर नियंत्रण, नकारात्मकतेतून मुक्ती आदी विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. सहभागी नागरिकांनी विविध शारीरिक व मानसिक आरोग्यवर्धक क्रियांचा लाभ घेतला.या शिबिरात तब्बल ४५ जणांनी सहभाग नोंदवत आनंद, उत्साह आणि अध्यात्मिक ऊर्जा अनुभवली. शिबिरादरम्यान संपूर्ण परिसर गुरुदेवांच्या प्रेरणादायी विचारांनी व नामस्मरणाने भारावून गेला होता.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. संतोष शिंदे सर, श्री. वैभव खरात, श्री. शिवाजी देवकर सर यांच्यासह सर्व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे शिबिराला उत्तम प्रतिसाद मिळाला.समारोप प्रसंगी सहभागींच्या अनुभवकथनांनी वातावरण भावूक झाले. शिबिराच्या अखेरीस महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन पोलीस पाटील जगन्नाथ माळकरी यांनी केले.

# जाफराबाद येथे 'नमो तेलबिया योजने'तून शेतकऱ्यांना मोफत सोयाबीन बियाणे वाटप

## आमदार संतोष दानवे यांच्या पाठपुराव्याला यश



जाफराबाद प्रतिनिधी

जाफराबाद: आ.संतोष पाटील दानवे यांच्या विशेष पाठपुराव्यातून जाफराबाद येथील श्री बालाजी कृषी सेवा केंद्रात 'नमो तेलबिया योजने'अंतर्गत मोफत सोयाबीन बियाणे वाटप कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. ऑनलाइन नोंदणी केलेल्या लाभार्थी शेतकऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते बियाण्यांचे वितरण करण्यात आले.या कार्यक्रमाचे उद्घाटन भाजपा तालुकाध्यक्ष नानाभाऊ भागिले आणि महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक पाटील साहेब यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी खरेदी-विक्री संघाचे चेअरमन सुधीर पाटील, माजी सभापती भाऊसाहेब पाटील जाधव, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष राजेश पाटील चव्हाण, उपसभापती साहेबराव पाटील लोखंडे, नगरसेवक सुरेश दिवटे, बेलोराचे सरपंच राजेश पाटील म्हस्के, मोहोराचे सरपंच गजानन पाटील लहाने आणि अंबादास पाटील जाधव प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाला कृषी विभागाचे सहाय्यक कृषी अधिकारी नखोत साहेब, मंडळ कृषी अधिकारी शेळके साहेब, तसेच श्री बालाजी कृषी सेवा केंद्राचे संचालक अमोल पाटील पडघन व कर्मचारी वर्ग उपस्थित होता. उपस्थित मान्यवरांनी शेतकऱ्यांना शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेत आधुनिक शेती पद्धतीचा अवलंब करण्याचे आवाहन केले. हा कार्यक्रम शेतकरी बांधवांच्या मोठ्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

# ॲग्रोव्हिजन गटशेती संघाचे नळविहिरा येथे मासिक चर्चासत्र उत्साहात संपन्न

जाफराबाद प्रतिनिधी

शेतकऱ्यांनी, शेतकऱ्यांचे शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरणेने उभारलेल्या ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने दर महिन्याच्या ९ तारखेला आयोजित करण्यात येणारे नियमित मासिक चर्चासत्र मंगळवार दि. ९ जून २०२६ रोजी मौजे नळविहिरा येथील पाटील स्मृती, पाटील कृषी फार्म, दमयंती नगरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात शिवारफेरीने झाली. उपस्थित शेतकरी बांधवांनी फार्मवरील विविध पीकपद्धती, फळबाग, सेंद्रिय शेतीचे प्रयोग, मुलस्थानी जलसंधारणाचे प्रयोग तसेच कमी खर्चातील शेती तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष पाहणी केली. शिवारफेरीदरम्यान शेतकऱ्यांनी आपले अनुभव मांडले तसेच विविध विषयांवर चर्चा केली.

चर्चासत्राची सुरुवात मातृवंदनेने करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांचे नैसर्गिक पद्धतीने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात ग्रोव्हिजन गटशेती संघाचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी संघाच्या कार्याचा आढावा घेत शेतकऱ्यांमध्ये ज्ञान, संशोधन व अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्याचे महत्त्व विशद केले. या चर्चासत्रासाठी श्री. अमोलजी शिंदे (तालुका कृषी अधिकारी, जाफराबाद), श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे (विभागीय समन्वयक, पाणी फाउंडेशन) आणि श्री. भगवानरावजी डोंगरे (चेअरमन, आयडियल ग्रीटेक प्रोड्युसर कंपनी लिमिटेड, सावरगाव हडप) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

मार्गदर्शन करतांना श्री. अमोलजी शिंदे यांनी शेतकऱ्यांनी बदलत्या हवामानाचा विचार करून आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा तसेच उत्पादन खर्च कमी करण्यासाठी वैज्ञानिक शेती पद्धती स्वीकाराव्यात, असे आवाहन केले. श्री. ज्ञानेश्वरजी इधाटे यांनी जलसंधारण, पाणी



व्यवस्थापन आणि सामुदायिक सहभागाचे महत्त्व पटवून दिले. पाण्याचे योग्य नियोजन केल्यास शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. श्री. भगवानरावजी डोंगरे यांनी शेतकरी उत्पादक कंपन्यांची भूमिका, सामूहिक विपणन, मूल्यवर्धन आणि बाजारपेठेतील संधी याविषयी मार्गदर्शन केले. संघटित प्रयत्नांमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण होऊ शकते, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

चर्चासत्रात उपस्थित शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील अनुभव, अडचणी आणि यशोगाथा मांडल्या. विविध पिकांचे व्यवस्थापन, नैसर्गिक शेती, फळबाग लागवड, बाजारपेठेतील बदल आणि शेतकरी संघटन शक्तीची भूमिका या विषयांवर मुक्त चर्चा झाली.

कार्यक्रमास पाणी फाउंडेशनचे क्षेत्रीय अधिकारी श्री. असलम बेग, श्री. किशोर इंगोले, सहाय्यक कृषी अधिकारी श्री. स्वप्नील पाटील, गेवराईचे श्री. अनिकेत तौर, वखारीचे श्री. रामप्रसाद खैरे, दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, डोलखेडा खुर्दचे श्री. भानुदासराव डोईफोडे, टेंभुर्णीचे श्री. जगन्नाथनाना देशमुख, गोंधनखेडचे श्री. संजय बोऱ्हाडे, नळविहिरा येथील श्री. ज्ञानेश्वर गाडेकर, श्री. हरिष मोरे, डॉ. स्वराज मोरे, श्री. संदेश मोरे, श्री. दिगांबर मोरे, श्री. युवराज मोरे, महादू गाडेकर यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने झाला. त्यानंतर उपस्थितांनी वनभोजनाचा आस्वाद घेतला.

साद तुमची, साथ आमची या ब्रीदवाक्याने कार्यरत असलेल्या ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एकत्र आणून ज्ञान, संशोधन आणि प्रत्यक्ष अनुभवांची देवाणघेवाण घडवून आणण्यासाठी अशा चर्चासत्रांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## पुरुषोत्तमपुरी येथील बोट दुर्घटनेनंतर आ. बबनराव लोणीकर यांचे

# प्रशासनाला तत्काळ मदतकार्याचे निर्देश

अधिक मासानिमित्त दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांची होडी गोदावरीत उलटली दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू गोळेगावच्या युवकांनी वाचविले अनेकांचे प्राण

परतूर पिराजी गायकवाड :- दि. १० जून श्रीक्षेत्र पुरुषोत्तमपुरी येथे आज गोदावरी नदीपात्रात एक अत्यंत दुर्दैवी घटना घडली. अधिक मासानिमित्त भगवान पुरुषोत्तम यांच्या दर्शनासाठी गोळेगाव येथून गोदावरी नदी ओलांडून पुरुषोत्तमपुरीकडे जाणाऱ्या भाविकांची होडी नदीपात्रात उलटल्याने दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला.


प्राप्त माहितीनुसार होडीत क्षमतेपेक्षा अधिक महिला व पुरुष भाविकांना बसविण्यात आल्यामुळे ही दुर्घटना घडल्याचे समोर आले आहे. या अपघातात अनेक भाविक नदीत पडले. घटनेची माहिती मिळताच गोळेगाव येथील तरुण युवक मंडळाने प्रसंगावधान राखत तत्काळ बचावकार्य सुरू केले. त्यांच्या शर्थीच्या प्रयत्नांमुळे अनेक महिला व पुरुष भाविकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले.

घटनेची माहिती मिळताच माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्काळ प्रशासनाशी संपर्क साधून मदत व बचावकार्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.त्यांनी उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी रेंगे, तसेच तहसीलदार जाधव यांना घटनास्थळी तातडीने पोहोचून मदतकार्य राबविण्याचे पंचनामा करून योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

बचाव कार्यात मदत करणारे गोळेगाव येथील नागरिक राजू इंद्रुके,दैवशाल आत्माराम बिजुले,यासीन रज्जाक शेख, दत्ता भंडारे,महानंदा सुनील बिजुले,मेनका दादाराव बिजुले, दासू लक्ष्मण बिजुले,नारायण भिकाजी वैराळे,कैलास नारायण बिजुले,भाऊ बंडू कसाब,लहू सोपान खरात,गौतम मल्हारी प्रधान,कान्हा सर्जेराव चुंबळे, इरफान शेख,छाया पंडित घुंगाशे,सुभाष कचरे,राजमती प्रधान बिजुले आदींनी धाडस दाखवत बचावकार्यामध्ये मोलाची मदत केली.

याप्रसंगी दादाभाऊ तौर, अण्णासाहेब ढवळे,तुकारामजी तौर तसेच गोळेगाव येथील समस्त ग्रामस्थ व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या दुर्घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.







हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

# आनंदगाव - सोनीजवळा रस्ता दोन वर्षभरापासून उखडून ठेवला

## रस्त्यावर अनेक अपघात,प्रवाशांना मरण यातना,गुत्तेदारांवर कारवाईची मागणी

केज/प्रतिनिधी

आनंदगाव सोनीजवळा रस्ता नवीन डांबरीकरण होणार मंजुरी आली असल्याचे सांगत गुत्तेदाराने आनंदगाव सोनीजवळा रस्ता गेल्या दोन वर्षभरापासून उखडून ठेवला आहे. यामुळे आतापर्यंत अनेक अपघात झाले आहेत.



प्रसूतीसाठी घेऊन जाताना एका बाळाला जीव गमावा लागला आहे.ऊस वाहतूक करणाऱ्या गाडीच्या बैलाला जीव गमवावा लागला आहे.रहदारीस अडथळा निर्माण होतो आहे.दुचाकी,चार चाकी बैलगाडी,पायी चालणे कठीण झाले आहे.आठ दिवसाचे आत काम सुरू न केल्यास आंदोलन करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग गुत्तेदारावर मेहरबान असल्याने वारंवार मागणी करूनही गुत्तेदार कोणालाजुमानत नाहीत बजेट नाही करता येईल पाणी नाही अशा प्रकारची उडवाउडवी चे उत्तरे देतात.

रस्ता पूर्ववत करून द्या

पूर्वीचा थोडा बरा असलेला रस्ता गुत्तेदाराने उकडून ठेवलेला आहे त्यावर ना दबई केली नाही.योग्य प्रकारची खडी मुरूम टाकण्यात आलेला नाही केवळ वरून थातूरमातूर उकरुन ठेवण्यात आलेला आहे.नवीन रस्ता करायचा नसल्यास किमान पूर्ववत जसा रस्ता होता तसाकरून द्या अशी नागरिकांची मागणी आहे.

अपघात झाल्यास गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा

दुचाकी चालवताना या रस्त्यावर अनेक वेळा अपघात होऊन हात,पाय फॅक्चर झाले आहेत. अनेकांनादवाखान्यामध्ये लाखो रुपये खर्च करावे लागले आहेत केवळ गुत्तेदार आणि रस्ता उकडून ठेवल्याने ही अपघात होत आहेत. यापुढे अपघात झाल्यास गुत्तेदारावर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी नागरिकांनी करत आहेत.

प्रसूतीसाठी घेऊन जाताना पोटातच बाळ दगावले

शेतात राहणाऱ्या एका महिलेला प्रसूतीसाठी रिक्षा घेऊन जात असताना प्रवासादरम्यान रस्त्यावरील दगडांच्या अडथळ्यांमुळे त्या आईचे मूल पोटातच दगावले असल्याची घटना मागील काही दिवसांपूर्वी घडली आहे

रस्त्याचे काम सुरू करण्यासाठी नेमका विलंब का होतो आहे?

वर्षभरापासून रस्ता उकळून ठेवून अद्याप केला जात नाही त्यास विलंब केला जातो आहे याचे नेमके कारण स्पष्ट होत नाही.अधिकाऱ्यांनी तात्काळ गुत्तेदारावर कारवाई करून रस्ता तयार करून द्यावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येणार असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## केजच्या मातीतील सुकन्येची जागतिक सुवर्णभरारी!

# जिवाचीवाडीच्या हिंदवी चौरेला वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिपमध्ये दोन सुवर्णपदके

केज/प्रतिनिधी

केज विधानसभा मतदार संघातील एका ग्रामीण भागातील सुकन्येने आपल्या अद्भूत कौशल्याच्या जोरावर क्रीडा जगतात भारताचा डंका वाजवला आहे. केज तालुक्यातील जिवाचीवाडी येथील सुकन्या कु.हिंदवी परमेश्वर चौरे हिने वर्ल्ड योगासना चॅम्पियनशिप मध्ये तब्बल दोन सुवर्णपदकांना (त्रेश्चव चशवरश्री) गवसणी घालत जागतिक पातळी वरऐतिहासिक कामगिरी केली आहे.तिच्या या सुवर्णभरारीमुळे संपूर्ण देशवासियांचे लक्ष केज मतदारसंघाकडे वेधले गेले आहे.गुजरात मधील अहमदाबाद येथे या जागतिक योगासन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि कडक स्पर्धेत हिंदवीने आपल्या उत्कृष्ट व अचूक कामगिरीच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत दुहेरी सुवर्णपदक पटकावले. जागतिक व्यासपीठावर सुवर्णपदक स्वीकारताना हिंदवीने भारताचा तिरंगा अभिमानाने उंचावला,तो क्षण संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी आणि विशेषतः बीड जिल्ह्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरला.

केजच्या मातीतून जागतिक व्यासपीठा पर्यंतचा प्रवास हिंदवीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आणि कठोर परिश्रम घेत योगासनामध्ये हे नैपुण्य मिळवले आहे.केजच्या मातीतून घडलेल्या या प्रतिभावान खेळाडूने थेट जागतिक पातळीवर आपल्या नावाचा आणि मतदारसंघाचा दबदबा निर्माण केला आहे. तिच्या या यशाने ग्रामीण भागातील खेळाडूंना योग्य संधी आणि मेहनत मिळाल्यास ते आकाश कशाप्रकारे कवेत घेऊ शकतात,हे दाखवून दिले आहे.



आमदार नमिता मुंदडा यांच्याकडून कौतुक आणि अभिनंदन

हिंदवीच्या या देदिप्यमान यशाबद्दल भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा अंबाजोगाई नगर पालिकेचे नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी तिचे विशेष कौतुक करत मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. हिंदवीने मिळवलेले हे यश केज मतदार संघासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. केजच्या मातीतील एका मुलीने जागतिक स्तरावर भारताचा तिरंगा फडकवला,ही आपल्या सर्वांसाठी गर्वाची गोष्ट आहे.हिंदवीची ही यशोगाथा केज मतदार संघातील आणि देशातील असंख्य युवा खेळाडूंना नक्कीच प्रेरणा देणारी ठरेल. तिला पुढील उज्ज्वल भविष्यासाठी खूप खूप शुभेच्छा!

-आ.नमिता मुंदडा

हिंदवी चौरे हिच्या या ऐतिहासिक कामगिरी मुळे सध्या जिवाचीवाडी व संपूर्ण केज तालुक्यात आनंदाचे वातावरण असून,तिच्यावर सर्व स्तरांतून कौतुकाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## गटबाजी, हेवेदावे विसरून, पक्ष, संघटना बाजूला ठेवून मातंग क्रांती मोर्चास उपस्थित रहा - पत्रकार शाम अडागळे

सिरसदेवी /प्रतिनिधी :-

भारतीय राज्यघटनेने अनुसूचित जातींना आरक्षणाचा अधिकार दिला असला, तरी त्याचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळालेला नाही. मातंग समाज आजही शिक्षण, रोजगार, प्रशासन, राजकीय प्रतिनिधित्व, जमीनधारणा, उद्योग-व्यवसाय आणि आर्थिक विकासाच्या विविध क्षेत्रांत अतीवंचित आहे. अनुसूचित जातींच्या आरक्षणातील लाभ काही मोजक्या घटकांपुरता केंद्रित झाल्याने मातंग समाजास अपेक्षित प्रतिनिधित्व आणि प्रगती साधता आलेली नाही. भारतीय सर्वोच न्यायालयाने अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणास घटनात्मक मान्यता दिली असून सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणाच्या वस्तुनिष्ठ निकषांवर आरक्षणाचे न्याय्य वितरण करण्याचा मार्ग मोकळा केला आहे.त्यामुळे सकल मातंग समाजाच्या वतीने बीड येथे आरक्षण उपवर्गीकरण समर्थनात येत्या १६ जूनला मातंग क्रांती मोर्चा निघणार आहे या मोर्चास लाखोच्या संख्येने मातंग बांधवानी उपस्थित रहावे असे आव्हान पत्रकार शाम अडागळे यांनी केले आहे.



हा मोर्चा कोणत्याही एका नेत्याचा पक्षाचा किंवा व्यक्तीच्या नावाचा नाही हा आपल्या संपूर्ण समाजाच्या अस्तित्वाचा हक्काचा आणि भविष्यासाठीची लढ्याचा मोर्चा आहे. बीड येथे १६ जूनला होणाऱ्या मातंग क्रांती मोर्चाला मतभेद गटबाजी आणि व्यक्तिगत विचार बाजूला ठेवून सर्व मातंग समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे यांनी समाजाला आव्हान केले आहे तसेच ही वेळ कोण मोठा आणि कोण छोटा हे पाण्याची नाही ही वेळ आपल्या समाजाच्या हक्कासाठी खांद्याला खांदा लावून उभे राहण्याची आहे आपण सर्वजण एकाच मातीतून आलो आहोत एका समाजाचे घटक आहेत आणि आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी मातंग समाजाने एकत्र लढणे हीच आजची गरज आहे.

## अंबाजोगाई पीपल्स बँक भारतरत्न सहकारीता सम्मान-२०२६ ने सन्मानित

# बेस्ट चेअरपर्सन म्हणून राजकिशोर मोदी तर अंबाजोगाई पीपल्स ठरली बेस्ट अर्बन को ऑपरेटिव्ह बँक

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, भारत नेटवर्क ग्रुप आणि नॅफकब यांच्या संयुक्त विद्यमाने भारत को-ऑपरेटिव्ह बँकींग समेट व प्रशिक्षण यांचे आयोजन नुकतेच ५ ते ७ जून रोजी लखनौ (उत्तर प्रदेश) येथे करण्यात आले होते. या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमात अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या बँकेला बेस्ट चेअरपर्सन म्हणून बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी तर अंबाजोगाई पीपल्स ठरली बेस्ट अर्बन को ऑपरेटिव्ह बँक या दोन श्रेणी मध्ये भारतरत्न सहकारीता सम्मान-२०२६ ने सन्मानित करण्यात आले. अंबाजोगाई पीपल्स बँकेने नेहमीच पारदर्शक, गतिमान कारभार व तत्पर ग्राहक सेवेला प्राधान्य दिले आहे. त्यामुळे सातत्यपूर्ण उत्तम टीमवर्क करून बँकेने जलद व अत्याधुनिक सेवा देवून सभासद, ठेविदार, ग्राहक आणि हितचिंतक यांची विश्वासार्हता कमावली आहे. यंदा चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेस मिळालेला हा तिसरा पुरस्कार आहे. हे दोन पुरस्कार उत्तम टीम वर्कचेच फलित आहे. सहकार क्षेत्रामध्ये काम करीत असताना एखाद्या बँकेने केंद्र सरकार, आरबीआय, सहकार खाते आणि बँकींगचे सर्व नियम पाळून समाजातील शेवटच्या घटकांपर्यंत बँकींग सेवा, विविध सुविधा उपलब्ध करून देते. गतवर्षी अंबाजोगाई पीपल्स बँकेस एनपीएचे व्यवस्थापन सर्वोत्तम केले याची दखल घेत आशिया खंडातील सहकारी बँकिंगसाठी सर्वात मोठे व्यासपीठ असलेले भारत को-ऑपरेटीव्ह बँकिंग समितीच्या वतीने मुंबई येथे भारतरत्न सहकारिता पुरस्कार देवून गौरविण्यात आलेले आहे. तर सलग दुसऱ्या वर्षी मागील महिन्यात बँकेस क्रेस्ट इन्फो मिडिया यांच्या वतीने पुणे येथे आयोजित ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकींग सम्मीट ऍण्ड अवॉर्ड - २०२६ या सोहळ्यात सर्वोत्कृष्ट ग्राहक सेवा उपक्रम पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले आहे. तर नुकतेच पुणे नागरी सहकारी बँक्स असोसिएशन, भारत



नेटवर्क ग्रुप आणि नॅफकब यांच्या संयुक्त विद्यमाने भारत-को-ऑपरेटिव्ह बँकींग समेट व प्रशिक्षण यांचे आयोजन ५ ते ७ जून २०२६ रोजी लखनौ (उत्तर प्रदेश) येथे करण्यात आले होते. या राष्ट्रीय पातळीवरील कार्यक्रमात अंबाजोगाई पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.अंबाजोगाई या बँकेला बेस्ट चेअरपर्सन म्हणून बँकेचे चेअरमन राजकिशोर कांताप्रसाद मोदी तर अंबाजोगाई पीपल्स ठरली बेस्ट अर्बन को ऑपरेटिव्ह बँक या दोन श्रेणी मध्ये भारतरत्न सहकारीता सम्मान-२०२६ देवून सन्मानित करण्यात आले. सदरचा पुरस्कार रामदा बाय विंडहॅम लखनौ हॉटेल आणि कन्वेन्शन सेंटर येथे आयोजित एका विशेष समारंभात बँकेचे व्हाईस चेअरमन प्रकाश सोळंकी, संचालक प्रा.वसंत चव्हाण, संचालक ऍड.विष्णुपंत सोळंके यांनी स्विकारला.

# केज शहरातील फुलेनगर भागात वारंवार वीज पुरवठा खंडित

## नागरिक संतप्त,महावितरणच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

केज/प्रतिनिधी

केज शहरातील फुलेनगर परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.अनेक वेळा सलग १० ते १२ तास वीजपुरवठा बंद राहत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



महावितरणकडून वीज बिल थकीत असल्यास ग्राहकांचे मीटर काही तासांत तोडण्याची कारवाई केली जाते. मात्र,वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तासन्तास वीज येत नसल्यास नागरिकांनी कोणाकडे दाद मागायची,असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.विशेष म्हणजे,वीज कार्यालयाचे संपर्क क्रमांक नागरिकांच्या सेवेसाठी उपलब्ध असल्याचे सांगितले जाते.परंतु अनेकदा तक्रार नोंदविण्यासाठी फोन केल्यास संबंधित मोबाईल क्रमांक बंद असल्याचे आढळून येते. त्यामुळे हे मोबाईल क्रमांक केवळ दिखाव्या साठी आहेत का,असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.वीज नसल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होत असून विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर तसेच व्यावसायिकांच्या कामकाजावरही परिणाम होत आहे. वारंवार वीजखंडित झाल्यामुळे फुलेनगर परिसरातील नागरिकांचा संयम सुटत चालला आहे.महावितरणच्या स्थानिक अधिकाऱ्यांनी या समस्येची तातडीने दखल घेऊन अखंडित वीजपुरवठा सुनिश्चित करावा,अन्यथा नागरिकांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल,असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ आज गेवराईत बैठक मतदारांनी उपस्थित रहावे

## बदामराव पंडित, बाळराजे पवारांचे आवाहन

गेवराई ( प्रतिनिधी ) लातूर-धाराशिव-बीड स्थानिक प्राधिकरण विधान परिषद मतदारसंघातील महायुतीतील भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ गेवराई येथे मतदारांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक भाजप नेते तथा माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या निवासस्थानी होणार आहे.



या बैठकीस महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांच्यासह भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजप नेते बाळराजे पवार तसेच भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांच्यासह जिल्हा व तालुका पदाधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. बैठकीत विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रचाराची दिशा, मतदारांशी संवाद तसेच पक्षाच्या भूमिकेबाबत चर्चा होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्व मतदार बंधू-भगिनींनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित आणि भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले आहे.विधान परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीकडे स्थानिक राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले

## देशाला पुन्हा गॅसकडून चुलीकडे नेणे हेच भाजपाचे धोरण : अँड श्रीनिवास बेदरे

गेवराई ( वार्ताहार ) : काँग्रेसने देशाला चुलीकडून गॅसकडे नेलं, देशाला पुन्हा गॅसकडून चुलीकडे नेणे हेच भाजपाचे धोरण आहे. असे प्रतिपादन अँड श्रीनिवास बेदरे यांनी केले आहे. पुढे बोलताना अँड श्रीनिवास बेदरे म्हणाले की सध्या गॅस सिलेंडरची किंमत १००० रुपयांच्या जवळ जाऊन पोहोचली आहे, पुढील एक - दोन महिन्यांत ही किंमत १५०० पर्यंत जाण्याची शक्यता आहे. जनतेवर पुन्हा चूल पेटवण्याची वेळ येणार आहे,



२०१४ पूर्वीचा काळ आठवतोय ?

गॅस सिलेंडर १० रुपयांनी महागला तरी भाजपाचे नेते रस्त्यावर येऊन धिंगाणा करायचे. आता स्वतः भाजपा सत्तेत असताना ५ महिन्यांत व्यावसायिक सिलेंडरच्या दरात १५७१ रुपयांची वाढ झाली आहे. आजच घरगुती गॅस सिलेंडरचे दर २९ रुपयांनी वाढले आहे. पेट्रोल, डिझेल, उछ्रऋ यांची अनेकदा भाववाढ झाली आहे. महागाईने जनता होरपळली जात आहे. पण आता भाजपाचे नेते रस्त्यावर आंदोलन करत नाहीत, त्यांच्यातील माणुसकी संपली आहे. आता जनता जगली काय, मेली काय भाजपला फरक पडत नाही. पण

या चुलीचे चटके सरकारला बसल्याशिवाय राहणार नाहीत.असे प्रतिपादन बीड जिल्हा युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अँड श्रीनिवास बेदरे यांनी प्रसिद्धी द्वारे म्हटले आहे.

# समाजहिताची लेखणी आणि जनतेचा विश्वास जपणारे पत्रकार
## गहिनीनाथ पाचबैल यांच्यावर वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) समाजातील घडामोडींवर अभ्यासपूर्ण आणि सकारात्मक वृत्तांकन करत सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे, तसेच आपल्या लेखणीतून समाजप्रबोधनाचे कार्य करणारे दैनिक झुंजारनेताचे ज्येष्ठ पत्रकार गहिनीनाथ पाचबैल यांचा वाढदिवस रविवार, दि. ७ जून २०२६ रोजी मातकुळी येथे उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला असून विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष, दूरध्वनी तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छांचा वर्षाव केला.

पत्रकारिता हे केवळ वृत्त देण्याचे माध्यम नसून समाज परिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, याची जाणीव ठेवून गहिनीनाथ पाचबैल यांनी अनेक वर्षांपासून प्रामाणिक आणि निर्भीड पत्रकारिता केली आहे. ग्रामीण भागातील समस्या, शेतकरी, विद्यार्थी, सामाजिक प्रश्न तसेच विकासकामांबाबत त्यांनी सातत्याने लेखणी चालवून समाजमनात विशेष स्थान निर्माण केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून मातकुळी ग्रामस्थांनी वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांचा सन्मान करून कृतज्ञता व्यक्त केली.



या सत्कार सोहळ्यास प्रतिष्ठित व्यापारी कांतीलाल जरे, सचिन नाना जरे, युवानेते अशोक दादा गोरे, संतोष काका डोके, सत्यम यादव, नामदेव डोके, डॉ. आप्पा डोके, सामाजिक कार्यकर्ते शेषराव आढाव, सुधाकर काका डोके, प्रकाश डोके मुकादम, भागवत दादा डोके, चक्रधर बिडकर, राम मामा जरे, विठ्ठल मामा जरे, पिराजी धोत्रे, महेंद्र वीर, माजी सरपंच अशोक धोत्रे, ग्रामपंचायत सदस्य अमोल भैय्या डोके, दत्तात्रय खराडे, माजी उपसरपंच बापूराव डोके, समाजसेवक मनोहर डोके, डॉ. विकास जरे, प्रकाश जरे, नानासाहेब जरे, प्रा. दत्तात्रय जरे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बंकट आबा पाचबैल, भाऊसाहेब बांगर, पप्पू पाचबैल, बाबुशेठ वीर, डॉ. युवराज डोके, वैभव जरे, चंद्रकांत (दाद्या) डोके, रेवन सोनवणे, उपसरपंच विशाल आबा जरे, धनंजय पवळ, सोमनाथ जरे, नितीन शेठ धनवे, अतुल धोत्रे, जयवंत जरे, हरिश्चंद्र धोत्रे, एकनाथ दादा खराडे, भिमराव खराडे, अर्जुन खराडे, मुकेश खराडे, निलेश गोड, बारकु गोड, संतोष धोत्रे, एकनाथ डोके, शरद डोके, चेअरमन भरत डोके, रविदादा पाटील, अनिल आण्णा डोके, प्रमोद माने, प्रशांत जरे (नाना), भाऊसाहेब जरे, निलेश डोके, महादेव समुद्रे, राजेंद्र समुद्रे, मनोहर पवळ, ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब बबन डोके, श्रीराम नाना जरे, अनिल धोत्रे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

याशिवाय दैनिक झुजारनेताचे संपादक अजित वरपे, प्रतिष्ठित व्यापारी मोहन ढाळे, सेंच्युरी कॉम्प्युटरचे संचालक शिवाजी काळदाते, डॉ. युवराज खराडे, डॉ. नाना जरे, पीएसआय परमेश्वर सांगळे, गणेश डोके, महेश डोके, परसराम माने, परसराम आढाव, दीपक पवार, दादासाहेब माने, संजय कावळे, नाना खराडे, राजेंद्र खराडे, दादासाहेब साप्ते, निकम, आदर्श मुख्याध्यापक संध्या श्रीराम टेकाळे, मुख्याध्यापक मधुकर गळगटे, ज्येष्ठ शिक्षक सिताराम माने, राजेंद्र भोसले, शिवराज जरे, सुनील सानप, जायभाय, संजय सरडे, ड. राकेश हंबर्डे, आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, अक्षय विधाते, आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष सानप, तांबोळी सर, ज्येष्ठ पत्रकार अनिल गायकवाड, प्रा. बिभीषण चाटे, बळीराम भोसले, प्रतिक डोंगरे, राम मामा डोंगरे, समीर खेमगर, रोजगार हमी योजनेचे माजी सदस्य जगन्नाथ ढोबळे, नवनाथ डोके, सुरभी ब्लड बँकेचे संचालक राजेंद्र पवार, मोहन तात्या जरे यांच्यासह अनेक मान्यवरांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

तसेच वैभव जरे, निलेश जरे, पृथ्वी डोके, रामदास पाटील, कैलास पाचबैल, आकाश डोके, भरत डोके, भरत जरे, ऋषिकेश डोके, रोहन डोके, मुख्याध्यापिका माने मॅडम, चंद्रकला लाड मॅडम, सुषमा पवार मॅडम, प्रतिक्षा पवार, सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा सदाफुले आदींसह अनेक मित्रपरिवार, हितचिंतक आणि शुभचिंतकांनी व्हॉट्सप, फेसबुक व इतर सोशल मीडिया माध्यमांतून शुभेच्छा देत त्यांना दीर्घायुष्य व उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील वंचित, दुर्लक्षित आणि गरजू घटकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे गहिनीनाथ पाचबैल यांचे कार्य आगामी काळातही समाजासाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला. वाढदिवसानिमित्त झालेल्या शुभेच्छांच्या वर्षावामुळे मातकुळी परिसरात आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

# ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या पत्रकारितेच्या ३५ वर्षांचा गौरवशाली टप्पा
## निर्भीड,निष्पक्ष आणि समाजहिताची लेखणी

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी खांद्यावर समर्थपणे पेलत गेली तब्बल ३५ वर्षे समाजहिताची पत्रकारिता करणारे आष्टीचे सुपुत्र, दैनिक झुंजारनेताचे उपसंपादक तथा ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांच्या पत्रकारितेच्या अविरत आणि ध्येयवादी प्रवासाला आज ३५ वर्षे पूर्ण झाली आहेत. निस्वार्थ समाजसेवा, सत्याची कास आणि अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठविण्याच्या भूमिकेमुळे त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.



विद्यार्थीदशेपासूनच वाचन, लेखन आणि सामाजिक घडामोडींविषयीची जिज्ञासा यामुळे उत्तम बोडखे यांना पत्रकारितेची आवड निर्माण झाली. आष्टी येथील महाविद्यालयातून माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश केला. त्या काळात पत्रकारितेला आजच्यासारखी साधने, सुविधा किंवा आर्थिक शाश्वती नव्हती. मात्र समाजातील वंचित, पीडित आणि दुर्लक्षित घटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याच्या ध्येयाने त्यांनी हे क्षेत्र निवडले.

गेल्या साडेतीन दशकांतील त्यांच्या पत्रकारितेचा प्रवास हा केवळ वृत्तांकनापुरता मर्यादित राहिलेला नाही. समाजातील विविध प्रश्न, विकासकामांतील त्रुटी, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे निर्माण झालेल्या अडचणी, शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या यांना त्यांनी आपल्या लेखणीतून सातत्याने न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. अनेक वेळा त्यांनी शोध पत्रकारितेच्या माध्यमातून लपलेले विषय समोर आणत जनतेचे प्रश्न प्रशासनापर्यंत पोहोचवले. उत्तम बोडखे यांच्या लेखणीतून समाजातील गुणवंत विद्यार्थी, कर्तृत्ववान व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी, उद्योजक आणि विविध क्षेत्रांतील यशस्वी व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव होत राहिला. समाजातील सकारात्मक घडामोडींना प्रोत्साहन देतानाच अन्याय, भ्रष्टाचार आणि जनहिताच्या प्रश्नांवर त्यांनी सडेतोड भूमिका घेतली. त्यामुळे त्यांच्या पत्रकारितेला वाचकांचा मोठा प्रतिसाद आणि विश्वास मिळाला.

पत्रकारितेतील प्रामाणिकपणा, वस्तुनिष्ठता आणि निष्पक्ष वृत्तांकन या मूल्यांची त्यांनी आयुष्यभर जपणूक केली. कोणत्याही प्रकारचा दबाव, प्रलोभन किंवा पक्षपातीपणा न स्वीकारता सत्य मांडण्याचा त्यांनी कायम प्रयत्न केला. त्यामुळेच त्यांची ओळख एक विश्वासार्ह आणि निर्भीड पत्रकार म्हणून निर्माण झाली आहे.

त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत अनेक सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांनी वेळोवेळी त्यांचा विविध पुरस्कारांनी आणि सन्मानचिन्हांनी गौरव केला आहे. या सन्मानामुळे त्यांचा उत्साह वाढला असून समाजासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली आहे.

सध्या दैनिक झुंजारनेता च्या उपसंपादकपदाची जबाबदारी ते अत्यंत सक्षमपणे सांभाळत आहेत. वृत्तसंपादन, बातम्यांची अचूकता, भाषेची शुद्धता आणि सामाजिक भान या बाबींमुळे त्यांनी संपादकीय क्षेत्रातही आपला ठसा उमटविला आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि वैचारिक क्षेत्रातील विविध मान्यवरांशी असलेले त्यांचे स्नेहपूर्ण संबंध त्यांच्या व्यापक कार्याचा आणि सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय देतात.

पत्रकारितेतील ३५ वर्षांचा यशस्वी प्रवास आणि उपसंपादक म्हणून मिळालेली जबाबदारी हा दुहेरी गौरवाचा क्षण ठरत आहे. या निमित्ताने आष्टी तालुक्यासह जिल्हाभरातील पत्रकार बांधव, सामाजिक कार्यकर्ते, मित्रपरिवार, वाचक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजप्रबोधन, जनजागृती आणि लोकहिताची भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडत राहावे, त्यांच्या लेखणीला अधिक बळ, ऊर्जा आणि धार लाभावी, अशी अपेक्षा आणि शुभेच्छा सर्व स्तरातून व्यक्त होत आहेत. पत्रकारितेतील त्यांची ही ३५ वर्षांची यशस्वी वाटचाल नवोदित पत्रकारांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

# जगदिश ग्राफिक्स अँड ऑईल पेन्टिंग प्रा.लि.चे छत्रपती संभाजीनगर येथे लवकरच भव्य उद्घाटन
## आष्टीचे युवा उद्योजक जगदिश यांची डिजिटल ऑईल पेन्टिंग क्षेत्रात मोठी झेप

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) डिजिटल तंत्रज्ञानाच्या वेगवान युगात गुणवत्ता, विश्वास आणि ग्राहक समाधान या त्रिसूत्रीच्या बळावर यशाची नवी उंची गाठणाऱ्या युवा उद्योजक जगदिश यांनी डिजिटल ऑईल पेन्टिंग आणि फोटो रिस्टोरेशन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अल्पावधीतच ७०० हून अधिक समाधानी ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यानंतर आता त्यांच्या नेतृत्वाखाली जगदिश ग्राफिक्स अँड ऑईल पेन्टिंग प्रायव्हेट लिमिटेड या नव्या कंपनीची स्थापना छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात येत असून, कंपनीचे भव्य उद्घाटन लवकरच होणार आहे.



आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल आर्ट आणि आधुनिक ग्राफिक्स तंत्रज्ञानामुळे कला क्षेत्रात मोठे परिवर्तन होत आहे. अशा स्पर्धात्मक वातावरणात देखील ग्राहकांच्या अपेक्षांना न्याय देत, दर्जेदार सेवा पुरविण्याच्या माध्यमातून जगदिश यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कार्यामुळे केवळ मराठवाड्यातच नव्हे तर राज्यातील विविध भागांतील ग्राहकांनीही त्यांच्या सेवांना पसंती दिली आहे.जगदिश ग्राफिक्स अँड ऑईल पेन्टिंग प्रा. लि. च्या माध्यमातून ग्राहकांना जुन्या आणि खराब झालेल्या छायाचित्रांचे नूतनीकरण (फोटो रिस्टोरेशन), एचडी डिजिटल ऑईल पेन्टिंग, आकर्षक फोटो एडिटिंग, कस्टम डिझाईन, ग्राफिक्स डिझाईन, डिजिटल आर्टवर्क तसेच आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित विविध सर्जनशील सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. विशेष म्हणजे जुन्या आठवणींना नवसंजीवनी देणाऱ्या फोटो रिस्टोरेशन सेवेला ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत असून, अनेक कुटुंबांच्या जतन केलेल्या आठवणी पुन्हा नव्या स्वरूपात साकारण्यात कंपनीला यश मिळाले आहे.ग्राहकांचा वाढता प्रतिसाद आणि सातत्याने मिळणारा विश्वास यामुळेच कंपनीने आता अधिक व्यापक स्तरावर काम करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या कंपनीच्या माध्यमातून अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक उपकरणे आणि अनुभवी टीमच्या सहाय्याने अधिक जलद, दर्जेदार आणि ग्राहकाभिमुख सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. आगामी काळात डिजिटल आर्ट, प्रीमियम ऑईल पेन्टिंग, व्यावसायिक ग्राफिक्स डिझाईन, ब्रँडिंग, फोटो रिस्टोरेशन आणि सर्जनशील डिझाईन क्षेत्रात अनेक नवे प्रकल्प राबविण्याची तयारी सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे.

याबाबत बोलताना कंपनीचे संस्थापक जगदिश यांनी सांगितले की, ग्राहकांनी आमच्यावर दाखविलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा यामुळेच आज आम्ही हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठू शकलो आहोत. ७०० हून अधिक समाधानी ग्राहकांचा प्रवास हा आमच्यासाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे. नव्या कंपनीच्या माध्यमातून अधिक मोठ्या प्रमाणात, अधिक आधुनिक आणि उच्च गुणवत्तेच्या सेवा ग्राहकांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न राहील.कलेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत ग्राहकांच्या कल्पनांना वास्तवात उतरविण्याचे ध्येय समोर ठेवून सुरू झालेला हा प्रवास आता नव्या पर्वात प्रवेश करत आहे. त्यामुळे जगदिश ग्राफिक्स अँड ऑईल पेन्टिंग प्रा. लि. च्या स्थापनेमुळे डिजिटल ऑईल पेन्टिंग आणि ग्राफिक्स क्षेत्राला नवी दिशा मिळणार असून, युवा उद्योजकतेचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरणार आहे. दरम्यान, कंपनीच्या उद्घाटनाची तारीख, प्रमुख मान्यवरांची उपस्थिती आणि विविध विशेष उपक्रमांची माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे कंपनी व्यवस्थापनाने सांगितले आहे. त्यामुळे कला, डिझाईन आणि डिजिटल क्षेत्राशी संबंधित ग्राहकांमध्ये या उद्घाटनाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

# स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित कडा,ता.आष्टी च्या सभासदांसाठी मोठा निर्णय
## कर्जमर्यादा तब्बल ५० लाखांपर्यंत वाढवली

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) सभासदांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन आणि संस्थेची भक्कम आर्थिक स्थिती पाहता स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांच्या संचालक मंडळाने एक महत्त्वपूर्ण व सभासदहिताचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था नियामक मंडळ तसेच सहकार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या परिपत्रकासह संस्थेच्या उपविधीच्या अधीन राहून पतसंस्थेची एकूण कर्जमर्यादा वाढवून कमाल ५० लाख रुपये करण्यात आली आहे. या निर्णयामुळे संस्थेच्या शेकडो सभासदांना आर्थिक बळ मिळणार असून विविध गरजांसाठी मोठ्या प्रमाणात कर्जसुविधा उपलब्ध होणार आहे.



पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, सभासदांच्या एकूण वेतन मर्यादेनुसार कर्जवाटप करण्यात येणार आहे. यामध्ये मध्यम मुदत कर्जाची मर्यादा १० लाख रुपये निश्चित करण्यात आली असून, दीर्घ मुदत कर्जाची एकूण मर्यादा ५० लाख रुपये ठेवण्यात आली आहे. मध्यम मुदत कर्जाची रक्कम वजा केल्यानंतर उर्वरित पात्र रक्कम दीर्घ मुदत कर्ज म्हणून घेता येणार आहे. तसेच ज्या सभासदांनी मध्यम मुदत कर्ज घेतलेले नसेल त्यांना वेतन मर्यादेनुसार थेट ५० लाख रुपयांपर्यंत दीर्घ मुदत कर्ज उपलब्ध होणार आहे.

विशेष म्हणजे, सर्व प्रकारच्या कर्जांसाठी संस्थेने केवळ ८.५० टक्के इतका आकर्षक व्याजदर निश्चित केला आहे. सध्याच्या बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील व्याजदरांच्या तुलनेत हा दर सभासदांसाठी अत्यंत लाभदायक मानला जात आहे. त्यामुळे घरबांधणी, शिक्षण, वैद्यकीय खर्च, व्यवसायवाढ, मालमत्ता खरेदी किंवा इतर आर्थिक गरजांसाठी सभासदांना कमी व्याजदरात मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होणार आहे.

या नव्या कर्ज धोरणाची अंमलबजावणी १ जुलै २०२६ पासून करण्यात येणार असून त्यासाठी संचालक मंडळाने अधिकृत मंजुरी दिली आहे. ज्या सभासदांना कर्जाची आवश्यकता आहे त्यांनी विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्ज भरून पतसंस्थेच्या कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मानद सचिव, सर्व संचालक मंडळ सदस्य आणि कर्मचारीवर्ग यांनी सभासदांच्या हितासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले. संस्थेची आर्थिक घडी मजबूत असून सभासदांच्या प्रगतीसाठी आणि आर्थिक स्वावलंबनासाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याचे त्यांनी नमूद केले.सहकार चळवळीच्या माध्यमातून सभासदांच्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणि समृद्धी निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था मर्यादित, कडा या संस्थेच्या या निर्णयाचे सभासदांकडून स्वागत होत असून, ग्रामीण भागातील शिक्षक व कर्मचारी वर्गासाठी हा निर्णय अत्यंत दिलासादायक ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे. सहकारातून प्रगती, समृद्धीची नवी नांदी या ब्रीदवाक्याला साजेसा हा निर्णय संस्थेच्या प्रगतीचा आणि सभासदांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा टप्पा मानला जात आहे.

# महायुतीच्या विजयासाठी एकजुटीने काम करा,श्री.बसवराज पाटील यांचा विजय निश्चित-आ.सुरेश धस

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) स्थानिक स्वराज्य संस्था प्राधिकारी धाराशिव-बीड-लातूर विधान परिषद सार्वत्रिक निवडणूक निमित्त महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. बसवराज पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेला भव्य संवाद मेळावा लातूर येथील ग्रँड सरोवर हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री. रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली झालेल्या या मेळाव्यास लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश (आण्णा) धस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदार, लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महायुतीच्या उमेदवाराला पाठिंबा दर्शविला. यावेळी आमदार सुरेश धस यांनी उपस्थितांशी संवाद साधत महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणांचा आणि जनहिताच्या निर्णयांचा आढावा घेतला. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींनी विकासाच्या मुद्द्यांवर एकत्र येत महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.आपल्या मार्गदर्शनपर भाषणात आमदार सुरेश धस म्हणाले की, राज्यातील महायुती सरकारने सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. या विकासकामांमुळे जनतेचा विश्वास महायुतीवर अधिक दृढ झाला असून, आगामी विधान परिषद निवडणुकीत त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येतील. महायुतीच्या विकासाभिमुख विचारांना आणि जनहिताच्या भूमिकेला मिळणारा वाढता प्रतिसाद हा विजयाचा मजबूत पाया असल्याचे त्यांनी नमूद केले.महायुतीचे अधिकृत उमेदवार श्री. बसवराज पाटील यांच्या विजयासाठी सर्व घटकांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवक, पदाधिकारी आणि विविध लोकप्रतिनिधींनीही श्री. बसवराज पाटील यांना विजयी करण्यासाठी पूर्ण ताकदीने प्रचारात सहभागी होण्याचा संकल्प केला.

या संवाद मेळाव्यास महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील, आमदार अभिमन्यु पवार, माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित, श्रीमती अर्चना पाटील चाकूरकर, अक्षय भैय्या मुंदडा, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, युवा नेते योगेश क्षीरसागर, संतोष हांगे यांच्यासह आष्टी, पाटोदा व शिरूर कासार नगरपंचायतींचे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक तसेच महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.मेळाव्यात उपस्थित सर्व मान्यवरांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींशी प्रत्यक्ष संवाद साधत आगामी निवडणुकीतील रणनीती, विकासाचे मुद्दे आणि महायुतीच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा केली. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, धाराशिव-बीड-लातूर विधान परिषद मतदारसंघात महायुतीचा विजय निश्चित करण्यासाठी सर्व स्तरावर काम करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. या संवाद मेळाव्यामुळे महायुतीच्या प्रचाराला अधिक बळ मिळाले असून, स्थानिक स्वराज्य संस्थांतील प्रतिनिधींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी निवडणुकीत महायुतीचे उमेदवार श्री. बसवराज पाटील यांना विक्रमी मताधिक्याने विजयी करण्याचा विश्वास


# वीज,ट्रान्सफॉर्मर व सौर पंप प्रश्नांवर लोकनेते आ.सुरेश धस यांचा आक्रमक पाठपुरावा
## शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी महावितरणला दिल्या तातडीच्या सूचना

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी विधानसभा मतदारसंघातील शेतकरी, वीज ग्राहक आणि ग्रामीण भागातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर लोकनेते, मराठवाडा भूषण आमदार सुरेश (आण्णा) धस यांनी महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेऊन विविध प्रलंबित वीजविषयक प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. मतदारसंघातील वीजपुरवठा अधिक सक्षम, अखंडित आणि शेतकरी हिताचा करण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाच्या मागण्या अधिकाऱ्यांसमोर ठामपणे मांडल्या.

बैठकीत आष्टी तालुक्यातील दादेगाव, बीडसांगवी तसेच पाटोदा तालुक्यातील धनगर जवळका येथे मंजूर झालेल्या नवीन ३३/११ के.व्ही. उपकेंद्रांची कामे तातडीने पूर्ण करून ती कार्यान्वित करण्यात यावीत, अशी प्रमुख मागणी आमदार धस यांनी केली. या उपकेंद्रांच्या कार्यान्वयनामुळे परिसरातील शेतकरी व नागरिकांना वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्याच्या समस्येत मोठी घट होणार असून वीजपुरवठा अधिक स्थिर आणि दर्जेदार होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याचबरोबर आष्टा हरिनारायण, पोखरी व संबंधित ३३/११ के.व्ही. उपकेंद्रावर मंजूर असलेले नवीन ५ एमव्हीए ट्रान्सफॉर्मर तातडीने बसविण्याची मागणी देखील त्यांनी केली. सध्याच्या वाढत्या वीजभारामुळे अनेक ठिकाणी कमी दाबाने वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना पुरेशा क्षमतेने वीज मिळत नाही. नवीन ट्रान्सफॉर्मर बसवल्यास वीजभाराचे योग्य विभाजन होऊन शेतकऱ्यांना उच्च दाबाने व अखंडित वीजपुरवठा मिळेल, असे त्यांनी सांगितले.

आष्टी विधानसभा मतदारसंघात गेल्या काही वर्षांत जलसंधारण, शेततळे, सिंचन विहिरी, बंधारे तसेच विविध कृषी सिंचन योजनांमुळे शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढली आहे. परिणामी कृषी पंपांच्या नवीन वीजजोडण्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या परिस्थितीचा विचार करून शासनाच्या नियमांनुसार शेतकऱ्यांना आवश्यक त्या ठिकाणी विद्युत रोहित्रे उपलब्ध करून देऊन कृषी वीजपुरवठा अधिक सक्षम करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणीही आमदार धस यांनी केली.



बैठकीत सौर कृषी पंप योजनांबाबतही सखोल चर्चा झाली. अनेक लाभार्थी शेतकऱ्यांना सौर पंपांची क्षमता, पाण्याचा दाब आणि प्रत्यक्ष गरज यामध्ये विसंगती जाणवत असल्याने यावर उपाययोजना करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांच्या शेतीच्या गरजेनुसार सौर पंपांची क्षमता निश्चित करून त्यांना अधिक प्रभावी सेवा मिळावी, यासाठी आवश्यक सुधारणा करण्यावर भर देण्यात आला.

तसेच महावितरणच्या ईडीबी योजनेअंतर्गत ग्रामीण व शहरी भागातील वाढत्या वीज मागणीचा विचार करून सध्या वापरात असलेल्या ६३ केव्हीए क्षमतेच्या रोहित्रांऐवजी १०० केव्हीए आणि २०० केव्हीए क्षमतेची नवीन रोहित्रे उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यामुळे वीजभाराचा ताण कमी होऊन ग्राहकांना अधिक दर्जेदार व अखंडित वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे.

बैठकीदरम्यान महावितरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, महापारेषण विभागाचे अधिकारी तसेच सौर पंप प्रणालीचे मुख्य कार्याधिकारी यांच्या संयुक्त सहभागातून लवकरच विशेष बैठक आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीत शेतकऱ्यांच्या वीजपुरवठा, ट्रान्सफॉर्मर, कृषी पंप व सौर पंपासंदर्भातील सर्व प्रलंबित प्रश्नांवर ठोस उपाययोजना आखण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याला अखंडित व पुरेशा क्षमतेचा वीजपुरवठा मिळणे ही काळाची गरज आहे. मतदारसंघातील प्रत्येक शेतकरी आणि वीज ग्राहकाच्या समस्या सोडविण्यासाठी आपण सातत्याने पाठपुरावा करणार असून महावितरणच्या माध्यमातून आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत.

मतदारसंघातील वीज पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी आणि शेतकऱ्यांच्या सिंचन गरजा पूर्ण करण्यासाठी आमदार सुरेश धस यांनी केलेला हा आक्रमक पाठपुरावा भविष्यात ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम करण्यास महत्त्वपूर्ण ठरणार असल्याची भावना नागरिक व शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# किनवट बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुकीविरोधात पुन्हा धडक कारवाई

## २०० मीटर नो-पार्किंग क्षेत्राची प्रभावी अंमलबजावणी ; वाहनचालकांना नियमांचे मार्गदर्शन

किनवट प्रतिनिधी । दि. १० : राज्य परिवहन महामंडळाच्या महसूलात वाढ करणे, अवैध प्रवासी वाहतुकीस आळा घालणे आणि प्रवाशांना सुरक्षित व नियमित वाहतूक सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नांदेड विभागाच्या वतीने किनवट बसस्थानक परिसरात विशेष धडक मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत बसस्थानकापासून २०० मीटरपर्यंतच्या परिसरात नो पार्किंग झोन तसेच अवैध खाजगी प्रवासी वाहतूक प्रतिबंधक नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात आली. दि. १० जून २०२६ रोजी झालेल्या या कारवाईत मोटर वाहन निरीक्षक निलेश पवार, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक संघपाल कदम, सहाय्यक सुरक्षा निरीक्षक भागोराव वागतकर, चालक विश्वनाथ बोराटे, किनवट आगाराचे सहाय्यक वाहतूक अधीक्षक शिलरत्न ढगे, वाहतूक निरीक्षक साईनाथ मुंडे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक गंगय्या सटलावार तसेच राज्य परिवहन मार्ग वाहतूक



कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. कारवाईदरम्यान बसस्थानक परिसरातील २०० मीटरच्या हद्दीत उभ्या असलेल्या तसेच प्रवासी वाहतुकीसाठी अनधिकृतपणे वापरल्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या अनेक वाहनांना बसस्थानकाच्या हद्दीबाहेर हलविण्यात आले. यामुळे बसस्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली असून प्रवाशांना सुरक्षित वातावरण उपलब्ध झाले आहे. अधिकाऱ्यांनी यावेळी खाजगी वाहन चालकां सोबत संवाद साधत अवैध प्रवासी वाहतुकीमुळे होणारे कायदेशीर परिणाम, मोटार वाहन कायद्यातील तरतुदी तसेच राज्य परिवहन महामंडळाच्या महसूलावर होणारा परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली. भविष्यात अशा प्रकारे नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला. राज्याचे परिवहन मंत्री तसेच परिवहन महामंडळाच्या सुरक्षा व दक्षता विभागाच्या निर्देशानुसार नांदेड विभागात अवैध प्रवासी वाहतुकी विरोधात विशेष अभियान सुरू असून त्याचा एक भाग म्हणून किनवट येथे ही कारवाई करण्यात आली. बसस्थानक परिसरातून अनधिकृतपणे प्रवासी उचलणाऱ्या वाहनांमुळे एसटी महामंडळाच्या उत्पन्नावर परिणाम होत असल्याबरोबरच प्रवाशांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण होत असल्याने अशा वाहनांवर सातत्याने लक्ष ठेवले जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. या मोहिमेमुळे बसस्थानक परिसरातील अनधिकृत वाहतुकीवर नियंत्रण मिळविण्यास मदत होणार असून एसटीच्या अधिकृत सेवेला चालना मिळेल, असा विश्वास परिवहन विभागाने व्यक्त केला आहे. आगामी काळातही अशा प्रकारच्या तपासणी व अंमलबजावणी मोहिमा नियमितपणे राबविण्यात येणार

# शेतकऱ्यांनी लोकसहभागातून साकारला अडीच किलोमीटरचा रस्ता

किनवट /प्रतिनिधी

हुडी, करंजी, लोखंडवाडी, कोसमेट व ठाकरवाडी परिसरातील शेतकऱ्यांनी एकजुटीचे दर्शन घडवत लोकसहभागातून अडीच किलोमीटर लांबीचा व २० फूट रुंदीचा शिवरस्ता तयार करून ग्रामीण विकासाचा नवा आदर्श निर्माण केला आहे. इस्लापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती शिवाजीराव पाटील घोगरे (हुडीकर) यांच्या पुढाकारातून हे काम पूर्णत्वास गेले असून आता या कच्च्या रस्त्याचे कायमस्वरूपी सिमेंट काँक्रीट (सीसी) रस्त्यात रूपांतर करण्यासाठी शासनाने विशेष सहकार्य व संरक्षण द्यावे, अशी मागणी शेतकरी व ग्रामस्थांकडून होत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या परिसरातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्त्याचा अभाव भासत होता. या संदर्भात अनेक वेळा जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्याकडे निवेदने देण्यात आली होती. प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली व शिवाजीराव पाटील घोगरे यांच्या मध्यस्थीमुळे शेतकरी आणि प्रशासन यांच्यात समन्वय निर्माण झाला. त्यानंतर रस्ता मोकळा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. या रस्त्यासाठी शिवरस्त्याच्या दोन्ही बाजूंच्या शेतकऱ्यांनी स्वेच्छेने प्रत्येकी दहा फूट जमीन उपलब्ध करून दिली. कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण न करता सर्वांनी विकासासाठी एकत्र येत मोठे योगदान दिले. याशिवाय रस्त्याच्या कामासाठी परिसरातील शेतकऱ्यांनी वर्गणी गोळा करून सुमारे तीन लाख रुपयांचा



**आता कच्च्या रस्त्याचे सिमेंट काँक्रीट रस्त्यात रूपांतर करण्यासाठी शासनाने सहकार्य व संरक्षण द्यावे**

निधी उभारला. या निधीतून जेसीबीच्या सहाय्याने रस्त्याचे अर्थवर्क पूर्ण करण्यात आले. सध्या हा रस्ता कच्च्या स्वरूपात तयार करण्यात आला असला तरी पावसाळ्यात चिखल, पाण्याचा निचरा आणि वाहतुकीच्या अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भविष्यात या रस्त्याचा पूर्ण लाभ मिळण्यासाठी त्याचे सिमेंट काँक्रीट रस्त्यात रूपांतर करणे अत्यावश्यक असल्याचे शेतकरी सांगत आहेत. शेतकऱ्यांनी स्वखर्चाने आणि स्वतःची जमीन देऊन शासनाचे लाखो रुपये वाचवले आहेत. त्यामुळे शासनानेही या लोकसहभागाची दखल घेऊन सदरील रस्त्याच्या सीसी रस्त्याच्या कामाला प्रशासकीय मान्यता द्यावी, आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा तसेच काम पूर्ण होईपर्यंत संबंधित शेतकरी व ग्रामस्थांना प्रशासनाकडून आवश्यक संरक्षण व सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. या रस्त्याचे सिमेंटीकरण झाल्यास शेतमालाची वाहतूक सुलभ होईल, कृषी यंत्रसामग्री सहजपणे शेतापर्यंत पोहोचू शकेल, विद्यार्थ्यांचा व ग्रामस्थांचा प्रवास सुरक्षित बनेल तसेच परिसरातील अनेक गावांच्या विकासाला गती मिळेल. लोकसहभागातून उभ्या राहिलेल्या या विकासकामाला शासनाची जोड मिळाल्यास हा रस्ता ग्रामीण विकासाचा आदर्श प्रकल्प ठरू शकतो, असा विश्वास परिसरातील शेतकरी व नागरिकांनी व्यक्त केला आहे.

# ग्रामपंचायतीतील आपले सरकार सेवा केंद्रांमधून आता ५०० हून अधिक शासकीय सेवा उपलब्ध

## सर्व केंद्रे अद्ययावत करण्याचे सीईओ मेघना कावली यांचे निर्देश

नांदेड जिल्हा प्रतिनिधी - ग्रामीण भागातील नागरिकांना विविध शासकीय सेवा व प्रमाणपत्रे गावपातळीवरच उपलब्ध व्हावीत, यासाठी ग्रामपंचायतींमधील आपले सरकार सेवा केंद्रे अद्ययावत करून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी दिले आहेत.

पूर्वी या केंद्रांमध्ये मर्यादित स्वरूपातील सेवा उपलब्ध होत्या. मात्र आता महा ऑनलाईनचे सर्व अधिकार ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रांना प्राप्त झाले असून महसूल विभागासह विविध विभागांच्या ५०० हून अधिक शासकीय सेवा गावपातळीवर उपलब्ध होणार आहेत.या सेवांमध्ये उत्पन्न, रहिवासी, जात, नॉन-क्रिमिलेयर, अल्पभूधारक, राष्ट्रीयत्व, जन्म, मृत्यू, विवाह प्रमाणपत्र, नमुना-८ उतारा आदी विविध दाखले व प्रमाणपत्रांचा समावेश आहे. तसेच पीक विमा, महाडीबीटीवरील अर्ज, मतदार नोंदणी, पॅन कार्ड अर्ज, आयुष्मान कार्ड, सातबारा उतारा, विविध शासकीय अनुदान योजना, वीज व पाणी बिल भरणा, बँकिंग सुविधा, शिष्यवृत्ती अर्ज, बांधकाम कामगार नोंदणी तसेच रेल्वे व बस आरक्षण आदी सेवाही या केंद्रांमार्फत उपलब्ध होणार आहेत.

या उपक्रमामुळे नागरिकांना तहसील कार्यालय, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याची आवश्यकता राहणार नाही. नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम यांची बचत होऊन शासकीय सेवा अधिक जलद, सुलभ आणि पारदर्शक पद्धतीने उपलब्ध होतील.

नांदेड जिल्ह्यातील १,३१० ग्रामपंचायतींमध्ये संगणक चालकांची नियुक्ती करण्यात आली असून प्रत्येक ग्रामपंचायतीला महा ऑनलाईनचे नवीन आयडी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. संबंधित आयडी व पासवर्ड कार्यान्वित करून सेवा केंद्रे पूर्ण क्षमतेने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर महाआयटीचे जिल्हा प्रकल्प प्रमुख कुलदीप जोशी तसेच राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियानाचे जिल्हा व्यवस्थापक माधव देवडे हे समन्वयक म्हणून कार्यरत आहेत.महा ऑनलाईनचे प्राप्त झालेले आयडी व पासवर्ड तातडीने कार्यान्वित करून ग्रामपंचायत स्तरावरील आपले सरकार सेवा केंद्रे पूर्ण क्षमतेने सुरू करावीत. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने सर्व ग्रामपंचायतींना पत्र पाठविण्यात आले आहे. नागरिकांना विविध शासकीय सेवा वेळेत, सुलभपणे व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तत्काळ कार्यवाही करावी

# गुन्हा दाखल होताच राजसेतूची धावपळ; पाडलेली संरक्षण भिंत पुन्हा उभारण्यास सुरुवात

नायगाव तालुक्यातील मानार प्रकल्प कार्यालय परिसरातील प्रकार; प्रशासनाच्या कारवाईनंतर कंत्राटदाराची घाईगडबड प्रकरणाचा थोडक्यात आढावा संरक्षण भिंत परवानगीशिवाय पाडल्याचा आरोप प्रकल्प व्यवस्थापकाविरुद्ध नायगाव पोलिसांत गुन्हा दाखल जलसंपदा विभागाच्या तक्रारीनंतर कारवाई गुन्ह्यानंतर पाडलेली भिंत पुन्हा बांधण्यास प्रारंभ कंत्राटदाराच्या मनमानीवर नागरिकांत संताप मानार प्रकल्प कार्यालयाची संरक्षण भिंत पुन्हा उभारण्यास सुरुवात नायगाव उमरी-नायगाव सिमेंट रस्ता प्रकल्पाच्या कामादरम्यान मानार प्रकल्प उपविभाग कार्यालयाची संरक्षण भिंत पाडल्याप्रकरणी नायगाव पोलिसार्ज गुन्हा दाखल होताच संबंधित यंत्रणा आणि कंत्राटदाराने हालचालींना वेग दिला असून पाडलेली भिंत पुन्हा उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. या घडामोडीमुळे प्रकल्पाच्या कामकाजावर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

काही दिवसांपूर्वी रस्ता कामासाठी शासकीय मालमत्तेचे नुकसान करत संरक्षण भिंत पाडण्यात आल्याचा प्रकार समोर आला होता. जलसंपदा विभागाने याबाबत नायगाव पोलिस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर प्रकल्प व्यवस्थापक सुनील मोरे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर अवघ्या काही दिवसांत भिंतीचे पुनर्बांधकाम सुरू झाल्याने या कारवाईमागील कारणांबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, संरक्षण भिंत पाडताना कोणत्याही नियमांची वा परवानगीची तमा बाळगण्यात आली नव्हती. शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्यानंतरही संबंधित यंत्रणा दीर्घकाळ मौन बाळगून होती. मात्र गुन्हा दाखल झाल्यानंतरच दुरुस्तीचे काम हाती घेतले गेल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.

उमरी-नायगाव रस्ता प्रकल्प सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. रस्त्याच्या दर्जाबाबत नागरिकांनी अनेकदा आक्षेप नोंदविले असून काही ठिकाणी कामे थांबविण्याची वेळही आली होती. आता संरक्षण भिंतीच्या प्रकरणामुळे पुन्हा एकदा प्रकल्प चर्चेत आला आहे.

नागरिकांचा सवाल

गुन्हा दाखल झाल्यानंतरच भिंत उभारण्याची आठवण का झाली?

संरक्षण भिंत पाडताना नियमांची पायमल्ली झाली नसल्यास ती पुन्हा उभारण्याची गरज का भासली, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. संबंधित प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही होत आहे.या प्रकरणात प्रशासनाने वेळेवर हस्तक्षेप करून कारवाई केल्यामुळेच नुकसानभरपाई आणि दुरुस्तीची प्रक्रिया सुरू झाली असल्याची चर्चा आहे. शासकीय मालमत्तेचे नुकसान करणाऱ्यांविरुद्ध पुढे कोणती भूमिका घेतली जाते, याकडे तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# अफवेनेच बंद झाल्या पानटपऱ्या; तामसातील अवैध धंद्यांचे वास्तव चव्हाट्यावर

तामसा -(प्रतिनिधी )मंगळवारी तामसा शहरात अन्न व औषध प्रशासनाचे पथक दाखल झाल्याची अफवा पसरली आणि सर्व पानटपऱ्या अचानक बंद झाल्या. किराणा दुकानदार, हॉटेल व्यावसायिक, खाद्यपदार्थ विक्रेते, गुटखा विक्रेत्यांची देखील एकच धावपळ उडाली. काहींनी भेसळयुक्त पदार्थांची लपवाछपवी केली, तर काहींनी गुटख्याचे साठे ईतरत्र हलविल्याची चर्चा आहे. प्रत्यक्षात कोणीच आले नाही, कोणती कारवाई झाली नाही. केवळ आयुक्त तुकाराम मुंडे नावाच्या वादळाने एवढी दहशत निर्माण केली की, अवैध धंदे चालकांची अक्षरशः झोप उडाली आहे. केवळ अफवेनेच पानटपऱ्यासह सगळंच बंद झाल्याने तामसातील अवैध धंद्यांचे वास्तव चव्हाट्यावर आले. नियमाप्रमाणे आणि कायदेशीर असेल, तर अफवेमुळे एवढी धास्ती का? तुकाराम मुंडे यांचे तामस्याकडे दुर्लक्ष का? असा प्रश्न तामसेकरांतून विचारला जात आहे.

तामसा शहरात गेल्या अनेक वर्षांपासून खुलेआम गुटखा विक्री, संशयास्पद खाद्य तेल, खाद्यपदार्थांची विक्री, उघड्यावर अन्नपदार्थ, दह-दूध-खवा-तेल, भेसळयुक्त, केमिकलयुक्त फळांची विक्रीबाबत तक्रारी आहेत. मात्र अन्न व औषध प्रशासनाकडून प्रभावी आणि सातत्यपूर्ण कारवाया होत नाहीत. त्यामुळे नागरिकांमध्ये प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे आहे. नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या भेसळयुक्त पदार्थ विक्री, गुटखा विक्रीवर तुकाराम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभरात धाडसत्र सुरू आहे. दरम्यान मंगळवारी तामसा शहरात अन्न व औषध प्रशासनाचे पथक आल्याची अफवा पसरली आणि पानटपऱ्या बंद झाल्याने खरे वास्तव समोर आणले. शहरातील अनेक व्यावसायिकांची चांगलीच भंबेरी उडाली. भेसळयुक्त माल लपविणे, संशयास्पद साठा हलविण्याची धावपळ उडाल्याने तामस्यात अवैध व्यवहार किती प्रमाणात सुरू असावेत, याची चर्चा नागरिकांमध्ये दुसऱ्या दिवशीही सुरू आहे. अन्न व औषध प्रशासनाने आता विशेष मोहीम राबवून सखोल तपासणी करावी, खऱ्या गुन्हेगारांना बेड्या ठोकाव्यात अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १४० प्रतिबंधात्मक कारवाया; १० लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त

नांदेड जिल्हा प्रतिनिधी जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतुकीविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत १४० प्रतिबंधात्मक कारवाया करून १० लाख ७२ हजार ८८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अशी माहिती राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस. एल. कदम यांनी दिली.

पुणे-फुगेवाडी येथे मिथेनॉल मिश्रित हातभट्टी दारू सेवनामुळे घडलेल्या दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर नांदेड जिल्ह्यात २९ मेपासून अवैध मद्यनिर्मिती, विक्री व वाहतुकीविरोधात विशेष मोहीम सुरू करण्यात आली. तसेच २ जूनपासून 'हातभट्टीमुक्त नांदेड जिल्हा' मोहीम राबविण्याचे आदेश देण्यात आले होते. राज्य उत्पादन शुल्क आयुक्त, सहआयुक्त आणि विभागीय उपआयुक्त यांच्या निर्देशानुसार अधीक्षक एस. एल. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील निरीक्षक, दुय्यम निरीक्षक आणि भरारी पथकांनी २९ मे ते ८ जून या कालावधीत ही कारवाई केली.या कालावधीत एकूण १४० गुन्हे नोंदविण्यात आले असून १३७ वारस प्रकरणे दाखल करण्यात आली. १४२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. कारवाईदरम्यान १ हजार ९८ लिटर हातभट्टी दारू, १३१२० लीटर रसायन, २४२.२६ लिटर देशी मद्य, ८.१० लिटर विदेशी मद्य, ३ लिटर बिअर आणि १ हजार ७४६ लिटर ताडी जप्त करण्यात आली. याशिवाय तीन वाहनेही जप्त करण्यात आली.

सराईत गुन्हेगारांविरोधातही विशेष कारवाई करण्यात आली आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ९३ अंतर्गत ३९ प्रकरणे दाखल करण्यात आली असून चांगल्या वर्तणुकीचे बंधपत्र दिल्यानंतरही गुन्हे करणाऱ्या सहा आरोपींविरुद्ध बंधपत्र उल्लंघनाची कारवाई करण्यात आली आहे. अशा आरोपींना हद्दपार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे.तसेच महाराष्ट्र प्रतिबंधक धोकादायक कृती कायदा (एमपीडीए) अंतर्गत एका आरोपीविरुद्ध कारवाई करून त्याला थेट कारागृहात पाठविण्यात आले आहे. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार ५ जून २०२६ रोजी ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत निरीक्षक जावेद कुरेशी, आशिष महिंद्रकर, लक्ष्मण पाटील, श्री. सरकाळे, तसेच कार्यकारी दुय्यम निरीक्षक सचिन शेट्टे, अमित वालेकर, रामप्रसाद पवार, अमित आढळकर, सुमेध चव्हाण, संदीप देशमुख, श्रीमंत बोरुडे, अमोल शिंदे, रेणुका सलगर, मोनिका पाटील, भरारी पथकातील रमेश राठोड, एकनाथ फडणीस आणि इतर अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

जिल्ह्यात कोणीही अवैध मद्य खरेदी करू नये. तसेच अवैध, बनावट किंवा परराज्यातील मद्याची विक्री अथवा साठा असल्याची माहिती नागरिकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाला द्यावी, असे आवाहन अधीक्षक एस. एल. कदम यांनी केले आहे. यासाठी विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००-८३३-३३३३ आणि व्हॉट्सॲप क्रमांक ८४२२००११३३ उपलब्ध आहे.राज्य उत्पादन शुल्क विभाग भविष्यातही अशा विशेष मोहिमा सातत्याने राबवून अवैध मद्यव्यवसायावर आळा घालण्यासोबतच शासनाच्या महसूलवाढीसाठी प्रयत्नशील राहणार असल्याचेही विभागाने स्पष्ट केले आहे.

# बीडच्या विकासासाठी आ.संदीप क्षीरसागर यांचा जोरदार पाठपुरावा

## मतदारसंघातील महत्वाच्या विकासकामांबाबत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांची घेतली भेट

मुंबई (प्रतिनिधी)

बीड शहराच्या विकासाला गती देण्यासाठी आणि रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मुंबईत शासनाकडे जोरदार पाठपुरावा सुरू केला आहे. बीड शहरातील अंतर्गत महामार्गाचे रुंदीकरण करणे आणि नगर परिषदेच्या विकासकामांवरील स्थगिती उठवणे या दोन प्रमुख मागण्यांसाठी त्यांनी मंगळवारी (दि.९) रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. महामार्ग रुंदीकरणासाठी केंद्रीय निधी उपलब्ध करून देण्यासाठी आ. संदीप क्षीरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन बीड शहरातील रस्ते विकासावर चर्चा केली.

सोलापूर-बीड-धुळे हा राष्ट्रीय महामार्ग बीड शहरातून जातो. हा मार्ग बीडच्या व्यापाराचा आणि दळणवळणाचा प्रमुख दुवा आहे. या मार्गावर वाढती वाहतूक, नागरिकांची गैरसोय आणि सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता



रस्त्याचे रुंदीकरण व आधुनिकीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. केंद्रीय मार्ग निधी कार्यक्रम सन २०२५-२६ अंतर्गत या कामाचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून, या प्रस्तावास विशेष बाब म्हणून तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी आ.क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली.

तसेच शहरातील भाजी मंडईच्या मंजूर कामांवरील स्थगिती उठवण्यासाठी आ. क्षीरसागर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. बीड नगर परिषदेला वैशिष्ट्यपूर्ण योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या विकासकामांच्या निधीवर सध्या स्थगिती आहे. ही स्थगिती तातडीने उठवण्याची मागणी त्यांनी केली. या निधीतून महात्मा फुले नवीन भाजी मंडई परिसराचे सुशोभीकरण व नूतनीकरण, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरातील भाजी मंडईचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. निधीअभावी ही कामे रखडली असून सर्वसामान्यांना याचा फटका बसत आहे. त्यामुळे संबंधित विभागाला तात्काळ कामे सुरू करण्याचे निर्देश द्यावेत, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली.

दरम्यान बीडकरांना चांगले रस्ते, सुरक्षित प्रवास आणि आधुनिक पायाभूत सुविधा मिळाव्यात यासाठी माझा सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. बीडच्या विकासासाठी आवश्यक असलेला प्रत्येक निधी आणि प्रत्येक प्रकल्प मंजूर करून घेण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

# प्रियकराच्या मदतीने पतीचा गेम,बीडमध्ये फिल्मी स्टाईल खून

बीड (प्रतिनिधी)

तालुक्यातील लिंबागणेश ते अंजनवती रस्त्यावर १ जून रोजी किरण बंडू सोनवणे या २७ वर्षीय तरुणाचा मृतदेह दुचाकीखाली दबलेल्या अवस्थेत आढळला होता. सुरूवातील पोलिसांना हा अपघात वाटला, पण नंतर खून झाल्याचं समजताच नेकनूर पोलीस या प्रकरणाचा छडा लावण्यासाठी गुंतल.

सुरूवातीला खून झालेल्या किरणचे दोन मित्रांना म्हणजेच दशरथ परदेशी व धीरज येडे यांना पनवेलमधून अटक केली होती. आता पोलीस कोठडीत झालेल्या तपासात या खुनात किरणची पत्नी प्रियंका सोनवणे ( वय २५ ) हिचाही सहभाग असल्याचं समोर आलं आहे.

पोलिसांनी सोमवारी दुपारी प्रियंकालाही अटक केली आहे. तीनही आरोपींना न्यायालयाने तीन दिवसांची वाढीव पोलीस कोठडी सुनावली आहे.किरण आणि प्रियंकाचे सात वर्षांपूर्वी लव्ह मॅरेज झाले होते. पण, किरण दारूच्या आहारी गेल्याने तो प्रियंकाला नेहमी मारहाण व शिवीगाळ करत त्रास देत असे. याच दरम्यान किरणचा मित्र दशरथ परदेशी याच्याशी प्रियंकाचे सूत जुळले. गेल्या चार महिन्यांपासून त्यांच्यात प्रेमसंबंध सुरू होते. पतीने दिलेल्या त्रासाचा बदला घेण्यासाठी आणि प्रेमात आंधळ्या झालेल्या दशरथ व प्रियंकाने दीड महिन्यापूर्वीच किरणच्या खुनाचा कट आखला होता. ३१ मे रोजीही प्रियंका आणि दशरथ यांच्यात फोनवर अडीच तास संभाषण झाले होते.

मित्राला दारू पाजून केले सामील

३१ मे रोजी दशरथने त्याचा मित्र धीरज येडे याला लिंबागणेश येथे आणून दारू पाजली आणि नशेत असतानाच त्याला या खुनाच्या प्लॅनमध्ये सामील करून घेतले. धीरज येडे याला आधी या




खुनाच्या कटाची कोणतीही माहिती नव्हती. त्याची पत्नी प्रसूतीसाठी माहेरी गेलेली आहे. मात्र, ऐनवेळी दशरथ या दारुड्या मित्राच्या नादी लागून आणि नशेच्या भरात होकार दिल्याने धीरजने स्वतःचे आयुष्य उद्ध्वस्त करून घेतले.

**मृतदेह रस्त्याकाठी आणून अंगावर दुचाकी टाकली**

३१ मे रोजी रात्री सर्वजण गावी निघाले असता, दशरथ किरणच्या दुचाकीवर बसला आणि धीरज दुसऱ्या दुचाकीवरून मागे होता. निर्जन स्थळी येताच दशरथने गाडी थांबवायला लावून किरणच्याच रुमालाने त्याचा गळा आवळला. दोघेही खाली पडल्यानंतर दशरथ आणि धीरज यांनी किरणला ओढत नालीकडे नेले आणि पुन्हा गळा आवळून त्याचा जीव घेतला. तो मेल्याची खात्री पटल्यावर त्यांनी त्याचा मृतदेह रस्त्याकाठी आणून अंगावर दुचाकी टाकली, जेणेकरून हा अपघाती मृत्यू दिसावा.